cmyk

## संपादकीय

### आता विकासाची कोंडी नको

राज्यातील विविध महानगर-पालिकांमध्ये सत्तास्थापनेच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यासाठी आवश्यक स्पष्ट बहुमत बहुतांश महानगरपालिकांमध्ये भाजपने जिंकले आहे. मतदारांनी त्यांचा कौल स्पष्टपणे नोंदवला आहे. तरीही 'देवाला' साकडे घालण्याचा आणि पक्षीय लोकप्रतिनिधींना एका ठिकाणी डांबण्याचा अनाठायी उद्योग पक्षांनी आरंभला आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२६३ मंगळवार दि.२० जानेवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### ...अन्यथा चंद्रपूर महापालिकेत विरोधात बसू

चंद्रपूरः चंद्रपूर महानगरपालिकेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाला असतानाच भाजप नेते व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी महापौरपदाबाबत ठाम भूमिका मांडली आहे. महापौर भाजपचाच होईल, अन्यथा भाजप विरोधात बसेल, असे स्पष्ट करत त्यांनी संवादातून मार्ग निघेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. काही काँग्रेस नगरसेवकांशी चर्चाही झाल्याचे सूचक विधान त्यांनी केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडण्याची शक्यता आहे. चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीनंतर निर्माण झालेल्या त्रिशंकू परिस्थितीवर प्रतिक्रिया देताना भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी सत्तास्थापनेबाबत आत्मविश्वास व्यक्त केला. कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्यामुळे सध्या पेच निर्माण झाल्याची चर्चा असली, तरी चंद्रपुरात फारसा पेच आहे, असे मला वाटत नाही, असे सांगत त्यांनी संवादातून तोडगा निघेल, असा विश्वास व्यक्त केला.

### मणिपूरमधील सामुहिक बलात्कार पिडितेचा मृत्यू

इम्फाळः मे २०२३ मध्ये मणिपूरमधील वांशिक दंगलीदरम्यान जमावाकडून लैंगिक अत्याचार झालेल्या कुकी-झो समुदायाच्या २० वर्षीय तरुणीचा अखेर न्यायाच्या प्रतीक्षेत मृत्यू झाला. जेव्हा तिचे अपहरण करून तिला एका सशस्त्र गटाच्या स्वाधीन करण्यात आले, तेव्हा ती केवळ १८ वर्षांची होती. इंडिजिनस ट्रायबल लीडर्स फोरम ने दिलेल्या माहितीनुसार, १० जानेवारी रोजी तिचा मृत्यू झाला. गेल्या दोन वर्षांपासून ती शारीरिक आणि मानसिक जखमांशी झुंज देत होती. अडीच वर्षांपूर्वी दाखल झालेली एफआयआर अजूनही इम्फाळ पूर्व येथील पोरमपत पोलीस ठाण्यात प्रलंबित आहे. तिच्यावर हल्ला करणाऱ्यांपैकी एकाचीही अद्याप ओळख पटलेली नाही. तिच्यावर झालेल्या अत्याचारानंतरच्या ३० महिन्यांच्या वेदनादायी प्रवासासाठी जबाबदारी निश्चित करावी, या मागणीसाठी कमिटी ऑन ट्रायबल युनिटीसह विविध कुकी-झो संघटनांनी मेणबत्ती मोर्चा काढला.

### गोव्यात दोन रशियन महिला पर्यटकांचा गळा चिरुन खून

पणजीः गोव्यात दोन रशियन महिला पर्यटकांचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी गोवा पोलिसांनी संशयित रशियन नागरिकाला अटक केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे अटक संशयिताने पाच जणांचा खून केल्याचा दावा केल्याने खळबळ निर्माण झाली आहे. याच दरम्यान, समोर आलेल्या आसामी महिलेच्या मृत्यू प्रकरणातही संशयिताच्या सहभागाची शक्यता पडताळून पाहिली जात आहे. गोव्यात हरमल येथे एलिना कास्तानोव्हा (३७) या महिलेचा गळा चिरुन खून केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी (१६ जानेवारी) मोरजीत एलिना वानिवा या महिलेचाही मृतदेह आढळून आला होता. दोन्ही महिला रशियन असल्याचे तपासात समोर आले आणि दोघींचाही गळा चिरुन खून केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान केली.

### चांदी ३ लाखांवर, सोन्याचे दरही वाढले

जळगाव : सध्या सोन्या- चांदीचे भाव जे धाडकन वाढत आहेत. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी, सोमवारी, चांदीच्या किमतींमध्ये इतकी मोठी वाढ झाली की १ किलो चांदीची किंमत तब्बल ३ लाख रुपयांच्या पुढे गेली. इतिहासात पहिल्यांदाच चांदीने हा टप्पा ओलांडला आहे. तर दुसरीकडे सोन्याच्या किमतीही नवीन उच्चांकावर पोहोचल्या. सोमवारी मल्टी-कमोडिटी एक्सचेंज मध्ये चांदीच्या किमती १३ हार ५५३ रुपयांनी वाढल्या आणि पहिल्यांदाच चांदीचे ३ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला. गेल्या आठवड्याच्या शेवटच्या व्यापार दिवशी, शुक्रवारी, चांदीचा दर प्रति किलोग्रॅम २ लाख ८७ हजार ७६२ रुपयांवर बंद झाला.

# यंदा कापसाचा दर गाठणार उच्चांकी टप्पा?

## शासनाच्या हमी भावापेक्षा बाजारात दर वाढला



पुणे । प्रतिनिधी

**यंदा कापूस उत्पादनात झालेली घट, बाजारातील अपेक्षेपेक्षा कमी आवक तसेच जागतिक व देशांतर्गत पातळीवरील घडामोडींचा परिणाम म्हणून कापसाच्या दराने मोठी उसळी घेतली आहे. सध्या कापसाचे दर प्रतिक्विंटल ८ हजार ५०० रुपयांपर्यंत पोहोचले असून, हे दर गत काही वर्षातील उच्चांकी मानले जात आहेत. दरम्यान, कापसाचे दर लवकरच प्रतिक्विंटल ९ हजार रुपयांचा टप्पा गाठणार असल्याचे कापूस विपणन तज्ज्ञांचे मत आहे. काही ठिकाणी मध्यम धाग्याच्या कापसाचे दर थेट ८ हजार ४०० ते ८,५०० रुपये प्रतिक्विंटल इतके नोंदविण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, खासगी व्यापाऱ्यांनी शासनाच्या कापूस महामंडळाच्या (सीसीआय) हमी भावालाही मागे टाकले असून, बाजारात सीसीआयपेक्षा अधिक दर मिळत आहे.**

यंदाच्या हंगामात कापूस लागवड क्षेत्रात घट झाली आहे. त्यासोबतच कापूस आयातीवरील शुल्कवाढ, सरकीच्या दरात झालेली वाढ आणि बाजारात अपेक्षेपेक्षा कमी आवक या कारणांमुळे कापसाच्या बाजारात तेजी निर्माण झाली आहे. हंगामाच्या सुरुवातीला ६ हजार ५०० ते ७ हजार रुपये प्रतिक्विंटल दरम्यान स्थिर असलेले दर आता थेट ८ हजार ४०० ते ८,५०० रुपयांपर्यंत पोहोचल्याने पांढऱ्या सोन्याने पुन्हा एकदा चमक दाखवली आहे. शासनाने २०२५-२६ हंगामासाठी १ मध्यम धाग्याच्या कापसाला ७ हजार ७१० रुपये, तर लांब धाग्याच्या कापसाला ८ हजार १०० रुपये प्रति क्विंटल असा हमीभाव जाहीर केला आहे. सीसीआयकडून ▶▶ पान २ वर

# महापौरपदाची आरक्षण सोडत २२ जानेवारीला

मुंबई । प्रतिनिधी

**महापालिकेमधील महपौरपदाच्या आरक्षण सोडतीबाबत एक महत्वाची माहिती समोर आली आहे. सर्व २९ महानगरपालिकामधील महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत २२ जानेवारी रोजी काढली जाणार आहे. त्यामुळे कोणत्या प्रवर्गाचा महापौर कोणत्या नगरपालिकेमध्ये बसणार हे २२ जानेवारीला निश्चित होईल. नगरविकास विभागाकडून महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत मंत्रालयात काढली जाईल.**

राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौर पदाचे आरक्षण निश्चितीसाठी आरक्षणाची सोडत राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, २२ जानेवारी रोजी, परिषद सभागृह, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे सकाळी ११ वा. पासून आयोजित करण्यात आली आहे. महापौर आरक्षणाची रोटेशन पद्धत बदलण्याबाबत चर्चा सुरु असल्याची माहिती समोर आली आहे. पुन्हा ओपनपासून सुरुवात करीत आरक्षण सोडतीच्या चक्राकार पद्धतीने महापौर आरक्षणाची सोडत निघण्याची शक्यता आहे. महापौरपदाचे आरक्षण चक्राकार पद्धतीने निश्चित ▶▶ पान २ वर

# नदीजोड प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अर्थसहाय्य करा

## महाराष्ट्राची केंद्र सरकारकडे मागणी

नवीदिल्ली । वृतसंस्था

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याकरीता राज्य सरकारने सुरु केलेल्या नदीजोड प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी केंद्र सरकारने अर्थसहाय्य करावे, अशी विनंती राज्याच्या वतीने सोमवारी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर पाटील यांच्याकडे करण्यात आली.**



राज्यातील सिंचन प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर पाटील यांच्या उपस्थितीत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री गिरीष महाजन, जलशक्ती विभागाचे केंद्रीय सचिव कांताराव, आयुक्त प्रविण कुमार, विभागाचे अप्पर मुख्य सचिव दिपक कपूर, सचिव डॉ.संजय बेलसरे यांच्यासह राज्याच्या सर्व पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यामध्ये सुरु असलेल्या सिंचन प्रकल्पांच्या कामाची माहिती केंद्रीय मंत्र्यांना देण्यात आली. सुरु असलेल्या कामाबाबत त्यांनी समाधानही व्यक्त केले. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत राज्यातील २९ प्रकल्पांचा समावेश करण्यात आला असून, यामध्ये कोकण पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत ५, विदर्भ पाटबंधारे ▶▶ पान २ वर

# शिंदेकडून एमआयएमला युतीचा प्रस्ताव?

## इम्तियाज जलील यांच्या दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ

छ.संभाजीनगर



मालेगाव महानगरपालिकेत एमआयएमने २१ नगरसेवक निवडून आणले आहेत. या पार्श्वभूमीवर एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी एक मोठा दावा केला आहे, ज्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जलील यांनी सांगितले की, ''मालेगाव सारख्या ठिकाणी आमचे २१ नगरसेवक निवडून आले आहेत. तिथे महापौर करण्यासाठी एकनाथ शिंदे यांच्याकडून स्थानिक नेत्यांना एक प्रस्ताव आला होता 'आपण सोबत येऊ शकता का?' असा हा प्रस्ताव होता. परंतु आमचे तिकडचे स्थानिक आमदार आणि नेत्यांनी ठामपणे नकार दिला. आम्ही भाजप सोबत किंवा शिवसेना (शिंदे गट) सोबत जाणार नाही, असे स्पष्ट पत्रकार परिषदेत सांगितले.'' या दाव्यामुळे महायुतीतील सत्तासमीकरणांवर नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांना मोठे यश मिळाले असतानाच, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) ने देखील जबरदस्त कामगिरी केली आहे. राज्यात एमआयएम दुसऱ्या क्रमांकाचा किंवा प्रमुख विरोधी पक्ष म्हणून उदयास आला आहे. मालेगाव, छत्रपती ▶▶ पान २ वर

# भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नवीन बिनविरोध

नवी दिल्ली । वृतसंस्था

**भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी अखेर नितीन नवीन यांची निवड करण्यात आली आहे. भाजपकडून १६ जानेवारीपासून राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीसाठी कार्यक्रम सुरू झाला होता, त्यानुसार सोमवारी अर्ज नामांकन प्राप्त आणि पाठिंब्याच्या जोरावर नितीन नवीन ३७ सेटसह भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. यापूर्वी त्यांना भाजपचे कार्यकारी अध्यक्ष बनविण्यात आले होते.**



या निवडीसाठी भाजपचे जवळपास सर्व मुख्यमंत्री, राज्य युनिट प्रमुख आणि वरिष्ठ नेते उपस्थित होते. भाजपने १४ डिसेंबर २०२५ रोजी नितीन यांची पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. आता, तेच राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. भाजप संगठन पर्व अनुसार भाजपचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी डॉ. के. लक्ष्मण यांनी परिपत्रकाद्वारे ▶▶ पान २ वर

# शिवसेना आणि धनुष्यबाण कुणाचा?

## सर्वोच्च न्यायालयात उद्या अंतिम सुनावणी

दिल्ली । वृतसंस्था

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा आणि दोन महत्त्वाच्या प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याचा पेच आता सर्वोच्च न्यायालयात सुटण्याच्या मार्गावर आहे. शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हाबाबत येत्या बुधवारी २१ जानेवारीपासून अंतिम सुनावणीला सुरुवात होत आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ सलग दोन दिवस या प्रकरणाचा युक्तिवाद ऐकून घेणार असून, राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारा निकाल लवकरच जाहीर होण्याची चिन्हे आहेत. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ चिन्हावर ▶▶ पान २ वर

# केवायसी होऊनही हप्ता मिळेना!

## राज्यातील लाडक्या बहिणींमध्ये नाराजी आणि संताप

मुंबई । प्रतिनिधी

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र महिलांना सरकारकडून प्रति महिन १५०० रूपयांचे मानधन दिले जाते. लाभार्थी महिलांच्या खात्यात नुकताच डिसेंबर महिन्याचा हप्ता जमा झाला. काही दिवसांत जानेवारी महिन्याचे १५०० रूपये महिलांच्या खात्यात जमा होणार



आहेत. पण ई केवायसीची प्रक्रिया संपल्यानंतर अनेक लाडक्या बहिणींचा १५०० रूपयांचा लाभ बंद झाला. पैसे बंद झाल्यानंतर राज्यातील महिलांमध्ये संताप वाढला असून, ऐन जिल्हापरिषद निवडणुकांपूर्वी महिलांमध्ये सरकारविषयी नाराजी पसरली आहे. राज्यातील मुंबई पुण्यासह वाशिम, बुलडाणा, यवतमाळ, लातूर, ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५१.५० क्विंटल | २,४०० | २,८९६ | २,६४० |
| ज्वारी/हायब्रिड : ४०.०० क्विंटल | २,१५० | ४,०७० | ३,२४२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १३३.०० क्विंटल | ३,९१० | ७,३०० | ६,८४१ |
| उडीद : ७.५० क्विंटल | २,५०१ | ६,५०० | ५,०८८ |
| बाजरी: ३३.०० क्विंटल | १,९५० | ३,५३६ | २,८०२ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,२०१ | ५,२०१ | ५,२०१ |
| सोयाबीन: ८६.५० क्विंटल | ५,१०० | ५,२११ | ५,१८३ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |

# राज्यात पुन्हा थंडीचा कडाका वाढणार, पुढील काही दिवस महत्वाचे

पुणे । प्रतिनिधी

**नववर्षाच्या प्रारंभी झालेल्या अवकाळी पावसानंतर राज्यातील हवामान सतत बदलत होत आहे. आता पुन्हा एकदा राज्यात थंडी वाढली असून पुढचे काही दिवस थंडीचा कडाका वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात किमान तापमानात लक्षणीय घट होण्याची शक्यता असून पुढील काही दिवस पहाटे आणि रात्री कडाक्याची थंडी जाणवू शकते.**

हवामान विभागाच्या माहितीनुसार, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील काही भागांत किमान तापमानात ३ ते ४ अंश सेल्सिअसपर्यंत घट



होण्याची शक्यता आहे. कोकण पट्ट्यात हवामान मुख्यतः स्वच्छ ते अंशतः ढगाळ राहणार आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह पालघर आणि रायगड जिल्ह्यांत पावसाची शक्यता नाही. या भागांत कमाल तापमान ▶▶ पान २ वर

# केवळ अपमानास्पद भाषा वापरणे गुन्हा नाही ॲट्रॉसिटीबाबत सुप्रीम कोर्टाचा मोठा निकाल

नवी दिल्ली । वृतसंस्था

केवळ अपमानास्पद भाषा वापरणे हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा ठरू शकत नाही. जोपर्यंत संबंधित व्यक्तीचा अपमान करण्यामागे तिची जात हे कारण नसते किंवा तिला जातीवरून कमी लेखण्याचा हेतू नसतो, तोपर्यंत केवळ अपमानास्पद शब्द वापरले म्हणून हा कायदा लागू होत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि




न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने दिला. संबंधित प्रकरणात एफआयआर किंवा दोषारोपपत्रात आरोपीने जातीवाचक शिवीगाळ केल्याचा किंवा जातीवरून अपमान केल्याचा कोणताही ठोस उल्लेख नसतानाही ही कारवाई सुरू ठेवण्यात आली होती. या प्रकरणी सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालयाने चूक केली, असे निरीक्षणही खंडपीठाने नोंदवले.

लाईव्ह लॉच्या रिपोर्टनुसार, बिहारमधील एका अंगणवाडी केंद्रात शिवीगाळ आणि मारहाण केल्याचा आरोप आरोपीवर होता. संबंधितावर भारतीय दंड विधानाच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# आता विकासाची कोंडी नको

राज्यातील विविध महानगर-पालिकांमध्ये सत्तास्थापनेच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यासाठी आवश्यक स्पष्ट बहुमत बहुतांश महानगरपालिकांमध्ये भाजपने जिंकले आहे. मतदारांनी त्यांचा कौल स्पष्टपणे नोंदवला आहे. तरीही 'देवाला' साकडे घालण्याचा आणि पक्षीय लोकप्रतिनिधींना एका ठिकाणी डांबण्याचा अनाठायी उद्योग पक्षांनी आरंभला आहे. आता त्यातील 'देवा' म्हणजे नेमके कोण हे कदाचित सत्ता स्थापनेच्या वेळी स्पष्ट होईलच. तथापि, यानंतर किमान पाच वर्षे तरी त्या त्या जिल्ह्यातील मतदारांना अशी कोणतीही लफ़डीकुलंगडी अपेक्षित नाहीत याची पक्की खूणगाठ राजकीय पक्षांनी मारलेली बरी. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये गेली आठ वर्षे प्रशासकीय राजवट, तर राज्यात युत्या-आघाड्यांचे स्वार्थी राजकारण सर्वांनी अनुभवले आहे. त्याला लोक चांगलेच वैतागले आहेत. लोकांनी ज्यांना समाजावरून ओवाळून टाकले असे बोलले जाते, त्यांनाही सत्तेचे गणित जुळवण्यासाठी पक्षांनी त्यांच्या वळचणीला बांधल्याचे लोकांनी सहन केले. कारण लोकांना आता खरोखरच विकास हवा आहे. त्यांचे प्रश्न सुटायला हवे आहेत. त्यांच्या मुलांना रोजगार हवा आहे. ज्याचे आश्वासन भाजपसह सगळ्याच पक्षांनी दिले आहे.

वास्तविक, प्रमुख राजकीय पक्षांना त्यांच्या धरसोड वृत्तीचा धडा शिकवणे मतदारांना सहज शक्य होते. पण तसे घडले नाही. राजकीय पक्षांपेक्षा मतदारांनी अधिक समंजसपणाचे प्रदर्शन घडवले. कुरघोडी, युत्या आणि आघाड्यांच्या राजकारणात विकास मरतो हे बुद्धिवंतांचे मत लोकांनाही पटले असावे. कदाचित म्हणूनच मतदारांनी अनेक ठिकाणी स्पष्ट कौल दिला असावा. त्याचे मर्म निदान भारतीय जनता पक्षाने तरी विसरू नये. मतदारांनाही तेच अपेक्षित आहे. कारण शहरांचे प्रश्न दिवसेंदिवस अधिक जटिल होत चालले आहेत. ज्याची सखोल माहिती नेत्यांना असेलच असे लोकांनी गृहीत धरले आहे. तरीही वानगीदाखल काही समस्यांचा उल्लेख त्यांना याची जाणीव करून देण्यासाठी पुरेसा ठरावा. मुंबई-नाशिकसारख्या महानगरांची विविध समस्यांमुळे कोंडी झाली आहे. त्यांच्या वाढीचे व्यवस्थापन आणि नियोजन ही मुख्य समस्या आहे. शहरे बकाल होत चालली आहेत. शहरांच्या विकासाची नाडी मानल्या जाणाऱ्या नद्या प्रदूषित आहेत. घनकचऱ्याचे व्यवस्थापन नसणे, वाहतूक कोंडी, सरकारी शाळांचा घसरता दर्जा, वाढते रस्ते अपघात, घाणीचे साम्राज्य-परिणामी वाढते सामाजिक अनारोग्य, सामान्यांना न परवडणारी घरे या त्यापैकी काही. हवामान बदल या समस्या अधिकाधिक जटिलच करतो. कारण त्यामुळे येणार्या नैसर्गिक आपत्ती माणसाला उद्ध्वस्त करतात. ही परिस्थिती पालटावी हेच मतदारांचे स्वप्न आहे. जे पूर्ण करण्याची जबाबदारी मतदारांनी प्रामुख्याने भाजपवर टाकली आहे. फडणवीसांवर विश्वास दर्शवला आहे. ते त्यांनाही मान्य आहेच. शब्दशः एकहाती मिळवलेल्या विजयाने त्यांनी पक्षावर मांड आहे हे अधोरेखित झाले आहे. तशीच मांड त्यांनी प्रत्यक्ष कारभारावर ठोकणे लोकांना अपेक्षित आहे. त्यासाठी नवनियुक्त नगरसेवकांनी विजयाचा उन्माद करू नये असा दम देणे पुरेसे नाही. अर्थात, तसा दम भरणे किती गरजेचे हेही लोकांनी पाहिले. पण लोकप्रतिनिधी खऱ्या अर्थाने 'नगरसेवक' म्हणून काम करतील याकडे सातत्याने लक्ष ठेवावे असेच मतदारांना वाटत असणार. लोकांच्या सुदैवाने म्हणा किंवा त्यांच्या समंजसपणामुळे म्हणा, केंद्र, राज्य आणि विविध महानगरपालिकांमध्ये एकाच पक्षाची सत्ता असू शकेल.

शहरांचा कायापालट करण्यासाठी सरकारे विविध योजना राबवतात. त्यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी उपरोक्त परिस्थिती अनुकूलच मानली जाईल. केंद्राच्या योजना थेट खालपर्यंत निधीसह आणण्यात, त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात कोणतीही अडचण जाणवणार नाही. सरकारे योजना जाहीर करतात आणि प्रशासन त्या अंमलात आणते. कोणे एकेकाळी 'अधिकारी आपले देखील ऐकत नाहीत' हे फडणवीस यांचे वक्तव्य चांगलेच गाजले. आता अशा सबबी सांगण्याची मुभा मतदारांनी ठेवलेलीच नाही. भाजपने शहरे समस्यामुक्त करावीत असेच मतदारांनी स्पष्ट केले आहे. बाकी, राजकारण-युत्या-आघाड्या-कुरघोड्या-फोडाफोडी-शह-काटशह चालतच राहील. मतदारही तेवढे नक्की समजून असतात. तेव्हा पक्षांनी राजकारण जरूर करावे. पण त्यात विकासाची कोंडी होणार नाही याची दक्षता भाजपने म्हणजे फडणवीस यांनी घ्यावी असेच मतदारांनी सूचित केले आहे. त्याची जाणीव त्यांना असेलच. कारण जनतेची नाडी त्यांना चांगलीच गवसली आहे यात शंका नाही.

# डिजिटल युगात वाचनाचे महत्त्व या विषयावर कार्यशाळा संपन्न



**गढी । प्रतिनिधी**

**जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर (गढी) येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत डिजिटल युगात वाचनाचे महत्त्व या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.**

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वसराव कदम होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. आर. एस. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. इनामदार मॅडम उपस्थित होत्या.मार्गदर्शन करताना डॉ. इनामदार यांनी सांगितले की, आज आपण माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात वावरत आहोत. डिजिटल माध्यमांद्वारे माहिती सहज उपलब्ध होत असली तरी त्या माहितीचा योग्य वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो आणि जीवनात सकारात्मक बदल घडतात. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. विश्वसराव कदम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा उल्लेख करत वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. वाचनामुळे माणूस प्रगल्भ बनतो, विचारशीलता वाढते आणि जीवन अधिक अर्थपूर्ण होते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. महाबळ गढाणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जयश्री ढवळे यांनी तर आभार प्रा. डॉ. रमेश शिरणे यांनी मानले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिविचाराचा विचारक्षमतेवर परिणाम-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**अतिविचाराने झोप कमी होते, लक्ष केंद्रित करणे कठीण जाते आणि अगदी साधे निर्णयही जड वाटू लागतात. अतिविचार कसा सुरू होतो हे समजून घेतल्याशिवाय तो कमी करणे शक्य होत नाही. मानवी मेंदूला अनिश्चितता आवडत नाही. अपूर्ण उत्तरे, न सुटलेले प्रश्न किंवा नियंत्रणाबाहेरील परिस्थिती यामुळे मेंदू सतत त्याच विचाराभोवती फिरत राहतो.या अवस्थेत ताणतणावाशी संबंधित कॉर्टिसोलसारखी हार्मोन्स वाढतात. दीर्घकाळ ताण राहिल्यास मेंदूतील अमिग्डाला, म्हणजेच धोक्याची जाणीव करून देणारा भाग, अधिक सक्रिय राहतो. त्यामुळे तटस्थ परिस्थितीदेखील धोकादायक भासू लागते. अधिक विचार केल्याने समस्या सुटेल, असा भ्रम निर्माण होतो; प्रत्यक्षात मात्र कोणतीही नवी दिशा मिळत नाही. अतिविचार शब्दांआधी शरीरात जाणवू लागतो. खांद्यांतील ताण, जबडा घट्ट होणे.**

श्वास उथळ होणे, ही त्याची सुरुवातीची लक्षणे असतात. या संकेतांकडे लक्ष दिल्यास विचारांची साखळी वेळीच थांबवता घेते. केवळ एका मिनिटासाठी श्वास संथ केल्यास मेंदूला सुरक्षिततेचा संदेश मिळतो आणि ताणाची तीव्रता कमी होते. अनेकदा मन शांत होण्याआधी शरीराला शांत करणे आवश्यक ठरते.अतिविचार बहुतेकदा काय झालं तर? अशा प्रश्नांवर पोसला जातो, ज्यांना शेवट नसतो. अतिविचार हा दोष नसून तो एक संकेत आहे. विश्रांतीची गरज, आश्वासनाची अपेक्षा किंवा स्पष्टतेचा अभाव, याकडे तो निर्देश करतो. स्वतःवर कठोर होण्याऐवजी समजूतदार दृष्टी ठेवली तर मानसिक ताण कमी होतो. संशोधन सांगते की सौम्य आत्मसंवादामुळे तणाव कमी होतो आणि भावनिक संतुलन सुधारते. विचार पुसून टाकणे हे उद्दिष्ट नसून, त्यांना संतुलित प्रतिसाद देणे हेच खरे मानसिक स्वास्थ्य आहे. अतिविचार ही मानसिक विकृती म्हणून सुरू होत नाही. अनेकदा तो काळजी, जबाबदारी आणि स्वतःचे संरक्षण करण्याच्या सहज प्रवृत्तीपासून जन्माला येतो. एखादी घटना पुन्हा पुन्हा मनात घोळवणे, शक्य परिणामांचा अंदाज बांधणे, भविष्यातील धोके आधीच ओळखण्याचा प्रयत्न करणे, हे सारे सुरुवातीला योग्यच वाटते. पण हाच विचारांचा प्रवाह जेव्हा थांबत नाही, तेव्हा तो उपयुक्त राहत नाही, उलट मनाची ऊर्जा शोषून घेतो. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.



# पाटोदा येथे मेगा लीगल कॅम्प उत्साहात पत्रकार बांधवांकडून न्यायमूर्तींचा गौरव



**पाटोदा । प्रतिनिधी**

**तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना कायद्याचे मार्गदर्शन मिळावे आणि न्यायव्यवस्थेची दारे त्यांच्यासाठी सुलभ व्हावीत, या उद्देशाने पाटोदा येथे भव्य मेगा लीगल कॅम्प (महारोजगार व कायदेविषयक शिबीर) आयोजित करण्यात आले होते. या विशेष प्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे माननीय न्यायमूर्ती श्री. किशोर संत साहेब आणि जिल्हा व सत्र न्यायाधीश माननीय आनंद यावलकर साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**

कार्यक्रमादरम्यान पाटोदा प्रेस क्लबच्या वतीने या दोन्ही मान्यवर कायदेतज्ज्ञांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रेस क्लबच्या पत्रकारांशी संवाद साधताना न्यायमूर्तींनी लोकशाहीत पत्रकारितेचे महत्त्व आणि कायद्याची जनजागृती करण्यात माध्यमांचा सहभाग यावर प्रकाश टाकला. पाटोदा प्रेस क्लबच्या सदस्यांनी दोन्ही न्यायमूर्तींची स्नेहभेट घेऊन त्यांना सन्मानित केले. यावेळी तालुक्यातील सामाजिक प्रश्न आणि न्यायालयीन कामकाजाबाबत अनौपचारिक चर्चा देखील झाली. न्यायमूर्ती किशोर संत यांनी प्रेस क्लबच्या या उपक्रमाचे कौतुक करून पत्रकारांनी जनसामान्यांपर्यंत कायदेविषयक माहिती पोहोचवण्याचे आवाहन केले. या मेगा लीगल कॅम्पमध्ये विविध शासकीय योजनांची माहिती, कायदेविषयक सल्ला आणि प्रलंबित प्रकरणांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराला पाटोदा परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. या प्रसंगी प्रेस क्लबचे सर्व पत्रकार बांधव, विधी क्षेत्रातील मान्यवर आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# गटशिक्षणाधिकारी शिंगारे यांच्या विरोधात आमरण उपोषण

**जालना । प्रतिनिधी**

**अंबड पंचायत समिती अंतर्गत शिक्षण विभागाचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी कार्यालय अंबड येथील श्री. डी. के. शिनगारे यांची मनमानी कारभार मुळे तसेच यांची सर्व कार्यालीन कामकाजाची तात्काळ चौकशी समिती अहवाल देत नसल्यामुळे जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.**




उपोषणकर्ते बाबासाहेब खरात यांनी उपोषण सुरू केले आहे. प्रभारी गटशिक्षणाधिकारी कार्यालय अंबड येथील श्री डी के शिनगारे यांची सर्व कार्यालीन कामकाजाची तात्काळ चौकशी समिती चौकशी अहवाल देण्यात यावे तसेच संबंधित प्रभारी गटशिक्षणाधिकारी शिंगारे यांच्या शासकीय केबिनची कधीही कुलूप लावलेली असती कार्यालय कर्मचाऱ्याकडून एकच उत्तर मिळतं साहेब मीटिंग ला गेले अशी खोटी माहिती देण्यात येत आहे. याप्रकरणी जिल्हा परिषदचे सीईओ मॅडम मिन्नू पी.एम यांनी चौकशी करून कारवाई करावी तसे आदेश शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद यांना देण्यात यावे.

# मंठा पोलीस ठाणे हद्दीतील पिकअप जालना पोलिसांनी पकडला

**मंठा । प्रतिनिधी**

मंठा पोलीस ठाणे हद्दीतून चोरीस गेलेल्या पिकअप वाहणाचा चंदनझिरा पोलीसांनी लावला शोध पोलीस स्टेशन मंठा पोलीस ठाणे हडितुन बऱ्याच दिवसापासून पिकअप वाहन चोरी झाले होते त्या अणुषंगाने सुरेश अवचार राहणार केंधळी तालुका मंठा यांनी पोलीस ठाणे मंठा येथे फिर्याद दिल्याने गुन्हा रजिस्टर नंबर अनुक्र-००११//२६ कलम-३०३(२) बिएनएस प्रमाने गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर गुन्हयात चोरी झालेली पिकअप क्रं. -२० -८९४९ किंमत ३,०००० रुपयेची असलेल्या वाहणाची गुप्त माहीती पोलीस ठाणे चंदनझिरा पोलीस निरीक्षक श्री बाळासाहेब पवार यांना मिळाल्याणे त्यांनी सदर वाहणाचा शोध घेणे करीता त्यांनी घेण्यासाठी पोलीस ठाणे चंदनझिरा येथिल अमलदार यांना कळवुन सदर चोरीच्या वाहणाचा शोध घेतला असता सदर वाहण एमआयडीसी भागात मिळुन आल्याने सदर वाहण ताब्यात घेवुन वाहणाची कायदेशिर प्रक्रिया पूर्ण करून पोलीस ठाणे मंठा यांच्याशी संपर्क करून व गाडी पोलीस ठाणे मंठा येथील तपासीक अंमलदार जे डी सुक्रे यांचे ताब्यातं देवुन पुढिल कायदेशिर कारवाई केली. सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल सर मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री आयुष नोपाणी सर, यांच्या मार्गदर्शनाखाली-पोलीस ठाणे चंदनझिराचे पोलीस निरीक्षक श्री बाळासाहेब पवार, मन्सुब वेताळ, पोहेकॉ कृष्णा तंगे , पोना शरद पवार, पोकों सुधाकर ढाकणे, यानी केली आहे.



## पान १ वरून...

### यंदा कापसाचा दर

हमीभावाने खरेदी सुरू असली, तरी बाजारपेठेत खासगी व्यापारी हाच कापूस ८ हजार १०० ते ८ हजार २०० रुपये, तर काही ठिकाणी ८ हजार ४०० रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी करत आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी सीसीआयऐवजी खासगी व्यापाऱ्यांकडे कापूस विक्रीस प्राधान्य देत आहेत. येत्या काळात या दरामध्ये आणखी वाढ होऊ शकते आणि यंदा कापूस दर उच्चांकी टप्पा गाठू शकतो, असे मत अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

--------------

### नदीजोड प्रकल्प पूर्ण करण्यासाठी

महामंडळा अंतर्गत ७, कृष्णा खोरे विकास महामंडळा अंतर्गत ९ आणि गोदावरी विकास महामंडळा अंतर्गत ४ तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत ४ प्रकल्पांची कामे सुरु असल्याचे केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. यापैकी कृष्णा व गोदावरी प्रकल्पाअंतर्गत सुरु असलेल्या १३ प्रकल्पांपैकी दहा प्रकल्प पुर्ण झाले असल्याची माहिती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत दिली. बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत कृष्णा व गोदावरी महामंडळाच्या अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांच्या कामापैकी १५ प्रकल्प पुर्ण झाले आहेत. उर्वरित दोन प्रकल्प पुर्ण करण्याकरीता विभागाचे प्रयत्न असून, या दोन्हीही योजनांच्या अंतर्गत सुरु असलेल्या कामांची गती वाढवून ही कामे पुर्णत्वास जाण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही केंद्रीय मंत्री सी.आर पाटील यांनी दिली.

**दुष्काळमुक्तीसाठी नदिजोड प्रकल्प**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात नदीजोड प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये प्राधान्याने दमणगंगा- एकदरे-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, कोकण गोदावरी खोरे, नळगंगा- वैनगंगा, पार गोदावरी या प्रकल्पांच्या कामासाठी अधिकच्या निधीची गरज असून, केंद्र सरकारने यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि गिरीष महाजन यांनी बैठकीदरम्यान केली.

----------

### महापौरपदाची आरक्षण

करण्यात येते. समाजातील सर्व घटकांना महापौर पदाची संधी मिळावी, यासाठी चक्राकार पद्धतीने आरक्षणाची सोडत काढण्यात येते. सध्या कायद्यात एससी, एसटी, महिला आणि ओबीसींसाठी रोटेशनने आरक्षण आहे. मात्र, नियमातील नव्या बदलानुसार चक्राकार पद्धत नव्याने सुरु केली जाऊ शकते.

------------

### भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी

माहिती दिली. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांसाठी अर्ज आणि निवडणूक प्रक्रिया संवैधानिक आणि पारदर्शी पद्धतीने पूर्ण झाली. ३६ पैकी ३० राज्यात झालेल्या संघटनात्मक निवडणुकीनंतर अर्ज आणि अर्ज माघारी घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. देशभरातून आलेल्या विश्वास आणि समर्थनाच्या जोरावर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितिन नबीन यांची निवड झाल्याचे के. लक्ष्मण यांनी जाहीर केले.

-------------

### शिंदेंकडून एमआयएमला

संभाजीनगर, नांदेड, अमरावती, धुळे आदी ठिकाणी पक्षाने मोठ्या संख्येने जागा जिंकल्या आहेत. जलील यांनी पुढे म्हटले की, राज्यातील तीन ते चार महापालिका अशा आहेत जिथे भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. वेळ पडली तर सर्व पक्ष एकत्र येतील. पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी स्पष्ट सांगितले आहे की, सन्मानाने तुम्ही आमचा सपोर्ट मागत असाल तर नक्कीच आम्ही पॉझिटिव्ह विचार करू. एमआयएमने भाजपबरोबर सत्ता भागीदारी न करण्याची भूमिका स्पष्ट केली आहे. दरम्यान, इम्तियाज जलील यांच्या या खुलाश्यामुळे महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणात नवे वळण लागण्याची शक्यता आहे. आता शिंदे गट आणि भाजप यावर काय प्रतिक्रिया देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

--------------

### केवायसी होऊनही

धाराशिव, बीड, छ. संभाजीनगरात हजारो 'लाडकी 'लाभापासून वंचित झाल्या आहेत. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळणाऱ्या राज्यातील हजारो महिलांची धाकधूक वाढली आहे. जवळपास ४० लाखांच्यावर महिलांचे केवायसी अभावी अर्ज बाद झाले असून, त्यांचे पैसे येणे बंद झाले तर अनेक ठिकाणी केवायसीत चूकी अथवा काही तांत्रिक अडचणीमुळे पैसे येणे बंद झाले आहेत. तर काही ठिकाणी सर्व बाबी योग्य असूनही नोव्हेंबर व डिसेंबरचा हप्ता खात्यात न आल्याने हजारो महिलांचा लाभ थांबला असून, योजना कायमस्वरूपी बंद होणार असल्याच्या अफवेमुळे महिलांनी जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयात मोठी गर्दी केली आहे. अन्य काही ठिकाणी लाडक्या बहीण योजनेचे पैसे येत नसल्याने महिला आंदोलनाला बसल्याचेही समोर आले आहे. हिंगोलीतील महिलांनी निवडणुकीनंतर सरकारची लाडकी बहीण दोडकी झाली का? असा प्रश्न विचारत सेनगाव, औंढा, कळमनुरी, वसमत, आणि हिंगोली अशा पाचही तालुक्यातून शेकडो लाडक्या बहिणी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्या. याशिवाय वाशिम जिल्ह्यातही लाडक्या बहिणींचाही उद्रेक समोर आला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील महिलांचा लाभ कायमस्वरूपी बंद होणार या अफवेमुळे महिलांनी बुलडाण्याच्या जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयात धडक दिली आहे. गेल्या दोन महिन्यापासून लाभ कशामुळे बंद झाला? याच्या चौकशीसाठी महिलांनी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले आहे. महिलांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून त्याचा थेट उद्रेक भंडारा जिल्ह्यात पाहायला मिळाला. संतप्त लाडक्या बहिणींनी मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्ग अडवत आंदोलन केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

**योजना बंद झाल्याच्या अफवांनी तणाव**

योजना बंद होणार अशा वावड्या उठल्याने ग्रामीण भागातील महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. यामुळे संतप्त आणि चिंतेत असलेल्या महिलांनी थेट कार्यालयात धडक देऊन चौकशी सुरू केली आहे. आम्हाला ई-केवायसीमधील त्रुटी दुरुस्त करण्याची संधी देण्यात यावी, जेणेकरून आमचा हक्काचा लाभ आम्हाला पुन्हा मिळेल, अशी मागणी लाभार्थी महिलांनी केली आहे.

----------

### शिवसेना आणि धनुष्यबाण

देखील सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार आहे. विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये तत्कालीन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविरोधात उघड बंड केले आणि आपल्या समर्थक आमदार व खासदारांच्या संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्हावर दावा सांगितला होता. त्यासंबंधीचा कायदेशीर लढा केंद्रीय निवडणूक आयोगापुढे झाला. त्यात आयोगाने संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्ह हे उद्धव ठाकरे यांच्याकडून काढून शिंदे यांच्या गटाला दिले होते.

--------------

### केवळ अपमानास्पद भाषा

१५ फेब्रुवारी २०२५ रोजी पाटणा उच्च न्यायालयाने आरोपीने दाखल केलेली याचिका फेटाळली होती. याविरोधात संबंधिताने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. शाजन स्कारिया विरुद्ध केरळ राज्य या अलीकडील खटल्याचा संदर्भ देत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने दोन अटी स्पष्ट केल्या. पहिली अट की, तक्रारदार व्यक्ती अनुसूचित जाती किंवा जमातीची असणे आवश्यक आहे. दुसरी अट, झालेला अपमान किंवा धमकी ही केवळ ती व्यक्ती त्या विशिष्ट जातीची आहे याच कारणावरून दिलेली असावी. खंडपीठाने स्पष्ट केले की, केवळ तक्रारदार मागासवर्गीय आहे म्हणून हा गुन्हा सिद्ध होत नाही, तर अपमान करण्यामागे त्या व्यक्तीला जातीवरून नीचा दाखवण्याचा हेतू असणे अनिवार्य आहे. तसेच, कलम ३(१)(एस) अंतर्गत गुन्हा ठरण्यासाठी शिवीगाळ करताना जातीचा उल्लेख केलेला असणे किंवा जातीच्या नावाने अपमान करणे आवश्यक आहे. या प्रकरणी न्यायालयाने म्हटले की, उपलब्ध कागदपत्रांवरून असे कुठेही सिद्ध होत नाही की, आरोपीने तक्रारदाराच्या जातीमुळे त्याला लक्ष्य केले. एफआयआरमधील आरोप जरी जसेच्या तसे मान्य केले, तरी प्राथमिकदृष्ट्या / कायद्यानुसार कोणताही गुन्हा घडल्याचे दिसत नाही. या निरीक्षणासह सर्वोच्च न्यायालयाने पाटणा उच्च न्यायालयाचा आदेश रद्द केला असून, संबंधित आरोपीविरुद्धची फौजदारी कारवाई रद्द केली आहे.

--------------

### राज्यात पुन्हा थंडीचा कडाका

३० ते ३२ अंशांच्या दरम्यान, तर किमान तापमान १८ ते २२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहील. सकाळच्या वेळेत काही ठिकाणी हलके धुके पडण्याची शक्यता असून त्याचा परिणाम दृश्यमानतेवर होऊ शकतो. समुद्रकिनारी थंड वारे वाहतील मात्र तीव्र थंडी जाणवणार नाही. पश्चिम महाराष्ट्रात दिवस आणि रात्रीच्या तापमानात फरक कायम राहणार आहे. विदर्भात मात्र थंडीची लाट अधिक तीव्र राहण्याची शक्यता आहे. नागपूर, गोंदिया, चंद्रपूर आणि वर्धा परिसरात किमान तापमान ८ ते १२ अंशांपर्यंत घसरण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सकाळच्या वेळेत तीव्र गारठा जाणवू शकतो, ज्याचा थेट परिणाम हा आरोग्य व वाहतुकीवर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## थोडक्यात



### वसंतराव भागवत आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील वसंतराव भागवत आश्रम शाळा सोनीमोहा याठिकाणी येथील निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले होते,

विमुक्त जाती भटक्या जमातीच्या मुलांना दऱ्या खोऱ्यात शिक्षणाची गंगा उपलब्ध करून देणारे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुमंतराव डुबे यांच्या वसंतराव भागवत आश्रमशाळा सोनिमोहा येथे विठ्ठल कागणे यांनी सदिच्छा भेट देऊन शाळेतील विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. या प्रसंगी शाळेतील विध्यार्थ्यांच्या व कर्मचारी गावकरी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला, त्यांनी शाळेतील शैक्षणिक प्रगती विषयी समाधान व्यक्त केले व शाळेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी शाळेतील शिक्षक वसतिगृह कर्मचारी व सभापती गावचे सरपंच, उपसरपंच गावकरी पालक बहुसंख्येने उपस्थित होते




### सरकारी कामगार अधिकारी यांना बांधकाम कामगारांच्या विविध मागण्या संदर्भात निवेदन

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील बांधकाम कामगारांचे मे २०२५ पासुन नोंदणी अर्ज प्रलंबित आहेत तसेच प्रलंबित नूतनीकरण,व लाभाचे अर्ज ताबडतोब निकाली काढा, तसेच गेल्या ४ वर्षांपासून अटल घरकुल योजनेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत ते तातडीने निकाली काढण्यात यावे, आणि जिल्हात तपासणी ते आरोग्य उपचार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी,व बांधकाम कामगारांना आर.पी.एल , प्रशिक्षणाचे प्रामाणपत्र व ४२०० रू वाटप करण्यात यावे.जिल्हा स्तरावरील बांधकाम कामगारांनाच्या प्रोफाईल मधील दुरुस्ती करण्यासाठी आलेल्या अर्जाचा लवकर निपटारा करावा.शैक्षणिक अर्थ साहाय्य योजने अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावे यासर्व न्याय मागण्याच निवेदन देण्यात आले हे निवेदन व सरकारी कामगार अधिकारी श्री.कोणाळे साहेब यांनी स्वीकारले व निवेदनातील सर्व मागण्यावर सकारात्मक चर्चा झाली व सर्व प्रलंबित अर्ज येत्या आठवड्यात निकाली काढु असा शब्द कामगार अधिकारी यांनी दिला.व सर्व मागण्याची गांभीर्याने दखल घेऊन लागलीच आर.पि.एल, आरोग्य योजनेच्या कर्मचाऱ्यांची बैठक लावली .

हे निवेदन लाल बावटा बांधकाम संघटनेचे जिल्हा सरचिटणीस कॉ.ओम पुरी, जिल्हा उपाध्यक्ष कॉ.पप्पु आजबे ,कॉ.भारत साळुंके,कॉ.दत्ता कोल्हे यांनी दिले.

# धन्य ते माय बाप ज्यांच्या घरी संत जन्म घेती – ह भ प श्रावण महाराज जगताप

बीड । प्रतिनिधी

जगात सर्वात भाग्यवान कोण असेल तर ते साधू संतांचे आई वडील आहेत आज ज्या आई वडिलांनी संत साधू बाबा यांना जन्म दिला ज्या आई वडिलांनी किसान बाबा व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांना जन्म दिला ते आई वडिलांचे भाग्य सर्वात मोठे आहे. ज्या आई वडिलांनी जगाच्या कल्याणासाठी आपल्या लेकरांना समाजासाठी अर्पण केलं ते आई वडिलांनी खरंच भाग्यवंत आहेत.असे अभंग विवेचन करताना ह भ प श्रावण महाराज जगताप यांनी धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन सेवा अर्पण करताना व्यक्त केले. जास्त पैशाच्या मागे धावण्यापेक्षा मुलांवर संस्कार करावे. आई वडिलांनी पैसाच्या मागे लागून आयुष्य खर्च करण्यापेक्षा आपल्या मुलांना वेळ देणं गरजेचे आहे मुलांवर संस्कार करणे आवश्यक आहे त्या मुळे आपला आचरण मुलं करत असतात आई वडिलांनी आचरण सुसंकृत असले पाहिजे मुल नेहमी मोठ्याच आचरण करतात

**नाथांच्या तपाने पुनीत झालेली भूमी 'गोरक्षनाथ टेकडी'**



**आई वडिलांची सेवा हिच ईश्वर सेवा**

समाजात अनेक माणसं आई वडिलांनी आश्रमात सोडतात व अनेक ठिकाणी देव सापडतात लाखो रुपये खर्च करत देव हा आपल्या आई वडिलांच्या सेवेत आहे आई वडिलांची सेवा हिच ईश्वर सेवा आहे

**आज टेकडी येथे सप्ताह सांगता**

आज दि.२० जानेवारी मंगळवार रोजी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सांगता गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांचे १० ते ११ प्रवचन व ह भ प अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे कीर्तन दुपारी १२ ते ०२ वेळेत संपन्न होणार आहे

**आज महाप्रदाच्या महापांगती**

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सांगता व महाप्रसादाच्या महापंक्ती होणार

## महालक्ष्मी विद्यालयात हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ रोजी आनंद नगरी व हळदी-कुंकू कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.**




आनंद नगरीचे उद्घाटन जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेश पवार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण सर होते. व्यासपीठावर वस्ती शाळेच्या मुख्याध्यापिका वरपे मॅडम, गावातील प्रतिष्ठित नागरिक सोलनकर, संजय मस्के, दिलीप जोगदंड, अशोक सातपुते, चिल्लेवाड सर, टेकाळे मॅडम, वाव्हळ सर, साळुंके मॅडम, सानप मॅडम, गुजर सर आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य, स्वावलंबन, कष्टाळूपणा, चिकाटी यांसारखे गुण रुजावेत तसेच त्यांना स्वतःच्या क्षमतेचे प्रदर्शन करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे या आनंद नगरी या उपक्रमाचे आयोजन आज सोमवार दिनांक १९ जानेवारी रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमात इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्यातील सुप्त गुणांचे दर्शन घडवले. 'विद्येचे मंदिर, आनंदाचे केंद्र' या संकल्पनेनुसार शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल्स उभारले होते. खाऊची दुकाने, खेळणी, भाजीपाला, आईस्क्रीम, विविध खेळ तसेच विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या वस्तू व शैक्षणिक साहित्याची विक्री करण्यात आली. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या या स्टॉलवरून मनसोक्त खरेदीसाठी पालक व ग्रामस्थांनी मोठी गर्दी केल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. या आनंद नगरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाचे प्रत्यक्ष धडे मिळाले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ होत असल्याची भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी स्वतः केलेल्या कमाईचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता.

याच वेळी आयोजित माता-पालक हळदी-कुंकू कार्यक्रमास शिदोड गावातील माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तसेच गावकरी, प्रतिष्ठित नागरिक, आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. राष्ट्रीताने या आनंददायी मेळाव्याची सांगता करण्यात आली.

## पान ६ वरुन...

### सिनियर डिव्हिजन मंजुरीबद्दल

बाळासाहेब शेकडे, अविराज निंबाळकर, रियाज सय्यद, ॲड. तांदळे, ॲड. रत्नदीप निकाळजे, ॲड. झांजे साहेब,ॲड. आदिनाथ पोकळे, ॲड. बाबासाहेब घोलप, ॲड. हनुमंत शिंदे, ॲड. विजय ढोबळे, ॲड. रमाकांत देशमुख, ॲड. विजय शेकडे, ॲड. डी. सी. शेख, ॲड. शरद कदम, ॲड. याशीर शेख, ॲड. खिल्लारे, ससाणे, पोकळे, भोकरे यांच्यासह आष्टी वकील संघाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित वकिलांनी सांगितले की, आमदार सुरेश आण्णा धस यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करून, प्रशासकीय पातळीवर प्रभावी भूमिका बजावत आष्टीसाठी उपजिल्हा न्यायालय मंजूर करून घेतले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे आष्टी तालुक्याच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले असून, तालुक्याला स्वतंत्र ओळख मिळाली आहे.

या निर्णयामुळे भविष्यात आष्टी न्यायालयात मोठ्या स्वरूपातील दिवाणी व फौजदारी प्रकरणांची सुनावणी होणार असून, न्यायदानाची प्रक्रिया अधिक सक्षम होणार असल्याचे मत वकील वर्गाने व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी आष्टी वकील संघाच्या वतीने लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

### आष्टीत आधार दिव्यांग

झांजे शाहू महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक काकासाहेब थोरवे अमोल थोरवे आदिनाथ दळवी मुख्याध्यापक काशीद सर गांधले सर उपस्थित होते यापुढेही आधार दिव्यांग पुनर्वसन संस्थेच्या माध्यमातून आष्टी तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी विविध योजना राबवण्यात येणार असून राज्य शासन व केंद्र शासन यांच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या योजना दिव्यांग बांधवापर्यंत पोहोचवण्याचे काम आधार संस्थेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे दिव्यांग बांधवांच्या ज्या अडचणी असतील त्या अडचणी आपण आधार दिव्यांग पुनर्वसन कार्यालयात संपर्क साधून सोडून घ्याव्यात आम्ही सर्वतोपरी मदत दिव्यांग बांधवांना करणार असल्याचे या संस्थेचे अध्यक्ष सुखदेव पोकळे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

### जिवंतपणीही संघर्ष आणि

स्मशानभूमीची अडचण असल्यास तत्काळ संपर्क करा

जिल्हाध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, सर्कल अध्यक्ष, गट/गण प्रमुख वंचित बहुजन आघाडी ग्रामपातळीवरील प्रत्येक प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध आहे.

लढाई कायदेशीर आणि आक्रमक असेल

ज्या ठिकाणी स्मशानभूमीची अडचण आहे, त्या गावाती नागरिकांनी पुढील कागदपत्रे तयार ठेवावीत, गावठाणातील नोंदी, ७/१२ उतारे, खासरा पत्रक, अतिक्रमण असलेल्या गट नंबरचा ७/१२ ही सर्व कागदपत्रे वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांकडे द्यावीत, जेणेकरून प्रशासकीय स्तरावर थेट आणि ठोस कारवाई करता येईल.

### पाटोदा येथील महाशिबिरात

महाशिबीरात लावला होता. यावेळी येथील नियुक्त कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम सांगून जनजागृती केली. वाहतूक नियमांचे पुस्तक देखील नागरिकांना वाटप करण्यात आले. तसेच ब्रेक आणलायझर मशीन सह विविध मशीन कसे कार्य करतात याची देखील नागरिकांना माहिती दिली. स्टॉलवर वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर,पोलीस हवालदार विष्णू काकडे, अजिनाथ मुंडे पोलीस हवालदार चालक संतोष हरके आदींची उपस्थिती होती.

### राष्ट्रीय सेवा योजना विशेष

संभाजीनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सल्लागार मा. सुनीलजी सानप यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांनी समाजसेवा, श्रमप्रतिष्ठा आणि ग्रामविकासासाठी प्रत्यक्ष कृती करणे किती आवश्यक आहे, यावर सखोल विचार मांडले. तसेच शिबिरातील उपक्रमांमध्ये स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध सहभाग घेऊन समाजाला सकारात्मक दिशा द्यावी, असे आवाहन केले.

यानंतर पत्रकार शरद रेडेकर यांनी मनोगत व्यक्त करत शिबिराच्या उपक्रमांना शुभेच्छा दिल्या व युवकांच्या सामाजिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे मा. अजिनाथ सानप यांनी आपल्या भाषणातून शिबिराच्या आयोजनाचे कौतुक करून ग्रामविकासासाठी असे उपक्रम सातत्याने राबविले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी भूषविले. अध्यक्षीय समारोपात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची आणि समाजपरिवर्तनाची प्रभावी चळवळ असल्याचे सांगून शिबिरातील प्रत्येक उपक्रमात स्वयंसेवकांनी प्रामाणिकपणे सहभाग घ्यावा, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास मा. संतोष सानप, सुदामबापु सानप आदी मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन डॉ. सुहास गोपणे यांनी व्यक्त केले.

या उद्घाटन समारंभाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. महेंद्र वैरागे, प्रा. शुभांगी खुडे, प्रा. माधव चव्हाण, प्रा. रविंद्र डोंगरे, धांडे सर यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. हे विशेष श्रमसंस्कार शिबिर कासेवाडी परिसरात शाश्वत विकासाच्या दृष्टीने सकारात्मक परिवर्तन घडवून आणेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## वाघोरा शाळेत बाल आनंद मेळावा संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघोरा १९ जानेवारी सोमवार रोजी सकाळी १० वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेच्या प्रतिमेचे पूजन करून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन शा. व्य.स.अध्यक्ष अरुण बादाडे, उपाध्यक्ष गणेश बादाडे,शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक एन. आर. राठोड, संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. मार्गदर्शन गणेश झाडे बबन कपाटे, केशव बादाडे, निदेशक केशव बादाडे, रवींद्र सावंत यांनी केले.**




या आनंदनगरीमध्ये विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद घेऊन आपापली दुकाने मांडली मिसळपाव, भेळ,समोसे, पाणीपुरी,इडली सांबर,पॅटीस, सँडविच, वडापाव, भजे, बालुशाही, चिवडा, गुलाबजाम असे पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वतः घरी तयार करून विक्रीसाठी आणले होते. काही विद्यार्थ्यांनी भाजीपाला, फळाची दुकाने,खेळणी घेऊन बसले होते.शंभर दोनशे रुपयापासून ते एका विद्यार्थ्याने सर्वात जास्त विक्री ९६० रुपयाची त्यात नफा ४९०रुपये झाला. हजारो रुपयाची या आनंदनगरीमध्ये खरेदी विक्रीचे उलाढाल झाली. यातून विद्यार्थ्यांना नफा- तोटा, व्यवहारिक ज्ञान, गणितीय क्रिया, लिटर,मापन, कमी – जास्त, गणन तसेच पैशाची देवाणघेवाण याचे ज्ञान मिळाले. खरेदीसाठी शाळेतील व गावातील विद्यार्थी, माता, पालक यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या आनंदनगरीतून सर्वांनी मनसोक्त आनंद घेतला.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य मानव उद्धारासाठी –डॉ.नारायण फुन्ने

**पाटोदा । प्रतिनिधी**

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ. विश्वास कदम व प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे याच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करण्यात आला.



याप्रसंगी सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. डॉ. नारायण फुन्ने यांनी मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्ताराचा लढा सविस्तरपणे सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य समग्र मानव जातीच्या उद्धारासाठी होते, हे सांगून त्यांची विचारधारा सविस्तरपणे व्यक्त केली.

याप्रसंगी प्रा. सोमनाथ घाडगे यांनी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर चळवळीवर भाष्य केले. गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. विनोद किर्दक यांनी सामाजिक मूल्यांचा हा लढा बराच काळ चालला, असे प्रतिपादन करून त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव या विद्यापीठाला मिळाले, हे या लढ्याचे यश असल्याचे सांगितले.

प्रोफेसर डॉ. सुनील जाधव यांनी अध्यक्षीय समारोप करताना असे म्हटले की, विद्यापीठातील सामाजिक स्थिती व समाज मूल्य, विद्यापीठाची शैक्षणिक वाटचाल, तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांची समाजाप्रती असलेली निष्ठा इत्यादींवर सविस्तरपणे प्रकाश टाकला. याप्रसंगी प्रास्ताविक प्रा.डॉ. शिवाजी काकडे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.डॉ. रामकृष्ण प्रधान यांनी केले. आभार प्रा.डॉ. बंडू लोखंडे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. बापू घोक्षे, प्रा. पापाजी चव्हाण, प्रा. प्रवीण शिलेदार यांनी परिश्रम घेतले.

## मोफत पशु चिकित्सा शिबिरास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




अंजनडोह । प्रतिनिधी

अंजनडोह येथे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिरामध्ये शेतकरी व पशुपालकांसाठी मोफत पशु चिकित्सा शिबिरामध्ये आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये गावातील शेतकरी वर्गाने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी पशु चिकित्सा शिबिरावेळी रासेयोजनेचे स्वयंसेवक व गावातील शेतकऱ्यांना प्रमुख मार्गदर्शन गटविकास अधिकारी श्री. वैजनाथ लोखंडे यांनी केले. या शिबिराच्या शेतकरी व स्वयंसेवकांना शिबिराच्या निमित्ताने सखोल व सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी पशु चिकित्सक डॉ. ए. ए. फुंदे यांनी शेतकऱ्यांना पशुंना होणाऱ्या विविध आजारांविषयी माहिती दिली. डॉ. राधिका वराडे पशुंची निगा याविषयी माहिती दिली. यानिमित्ताने गावातील विविध प्रजातींच्या जनावरांची आरोग्य विषयक तपासणी करून त्यांना होणाऱ्या दुर्धर आजारांविषयी काळजी कशी घ्यायची याविषयी जाणीव जागृती झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव यांनी केले. याप्रसंगी उपसरपंच प्रकाश सोळंके, पशुवैद्यकीय कर्मचारी श्री. नखाते, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, गावातील ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे तर आभार प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी मांडले.

## ज्ञानसाधना जिनियस स्कूल वडवणी येथे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील ज्ञानसाधना जिनियस स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे जीवन कार्याची माहिती व वक्तृत्व कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावे म्हणून शाळेचे संस्थापक डॉ.विजयकुमार निपटे,श्री.सुनील कुलकर्णी सर,श्री.अशोक आजबे सर,श्री.प्रशांत तोष्णीवाल सर यांच्या मार्गदर्शनाखाली १२ जानेवारी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन ज्ञानसाधना जिनियस स्कूल वडवणी येथे करण्यात आले होते.




या स्पर्धेमध्ये एकूण १५ शाळेतील ६४ विद्यार्थी स्पर्धक सहभागी झाले होते. मराठी, इंग्रजी,हिंदी तिन्ही भाषांमध्ये विद्यार्थ्यांनी आपलं वक्तृत्व आत्मविश्वासाने प्रभावी रित्या सादर केले रसिक श्रोत्यांनी टाळ्या वाजवून त्यांना दाद दिली. या स्पर्धेत बाल गटातून प्रथम – चि.प्रज्वल लांडे द्वितीय – कु. फपाळ आकांक्षा तृतीय – कु. श्रुती आजबे तसेच प्राथमिक गटातून प्रथम – कु. रेणुका जोशी,द्वितीय – कु. संस्कृती सावंत,तृतीय – चि. श्रवण कदम व माध्यमिक गटातून प्रथम – कु.अमृता मुंडे ( ज्ञानसाधना जिनियस इंग्लिश स्कूल,वडवणी.),द्वितीय – कु. प्रांजली डोंगरे,तृतीय – चि. कार्तिक रासवे आणि उच्च माध्यमिक गटातून प्रथम – कु. गौरी शिंदे,द्वितीय – कु. चिलगर यशोदा (महाराणी ताराबाई विद्यालय,वडवणी.),तृतीय – कु.डोरले श्रद्धा (महाराणी ताराबाई विद्यालय,वडवणी.)

हे विद्यार्थी विजेते ठरले त्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, स्मृतीचिन्ह,प्रमाणपत्र या स्वरूपाचे पारितोषिक देऊन गुणगौरव करण्यात आला.या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.साळुंखे सर,मुख्याध्यापक काळे सर यांनी काम पाहिलं. याप्रसंगी समर्थ क्लासेसच्या संचालिका सौ.कुलकर्णी मॅडम,लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्राचार्य भास्कर कुलकर्णी सर,व्याख्याते प्रा.अशोकजी खेत्री सर,प्रा.अंडील सर,प्रा.मुंडे सर, श्रीमती टकले मॅडम,श्रीमती बडे मॅडम,श्री.चव्हाण सर, पत्रकार शंकरजी झाडे सर,पत्रकार हनुमंत मात्रे सर अदीजन उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य देवराज प्रधान सर यांनी केले तर सूत्रसंचालन भागवत गोंडे सर व विद्यार्थिनींनी केले व आभार प्रदर्शन संस्थेचे संस्थापक श्री. अशोक आजबे सर यांनी केले.

# हरियाणाचे मुख्यमंत्री सैनी यांनी घेतली अर्थसंकल्पपूर्व बैठक

## शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याचा पुनरुच्चार

दिल्ली / वृत्तसंस्था

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि कृषी व संलग्न क्षेत्रांना नवी चालना देण्याच्या उद्देशाने हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी हिसार येथील चौधरी चरण सिंग हरियाणा कृषी विद्यापीठात नुकतीच अर्थसंकल्पपूर्व सल्लामसलत बैठक घेतली.

या बैठकीत कृषी शास्त्रज्ञ, प्रगतीशील शेतकरी, शेतकरी उत्पादक संघटना तसेच पशुपालन, फलोत्पादन, मत्स्यपालन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी संबंधित विविध भागधारक सहभागी झाले होते. राज्याच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पासाठी सूचना आणि मते जाणून घेणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. यावेळी बोलताना मुख्यमंत्री सैनी म्हणाले की, ''सरकार शेतकऱ्यांच्या गरजा आणि आव्हाने केंद्रस्थानी ठेवून धोरणे आखत



असून आगामी अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. देशाच्या अर्थव्यवस्थेला टिकवून ठेवण्यात शेतीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.'' असा त्यांनी पुनरुच्चार केला. हरियाणाची ओळख कष्टाळू शेतकरी आणि मजबूत ग्रामीण अर्थव्यवस्थेत खोलवर रुजलेली आहे. त्यामुळे आगामी अर्थसंकल्पात कृषी आणि संबंधित क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल, असे सैनी यांनी सांगितले. यावेळी त्यांनी ९ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या मागील अर्थसंकल्पपूर्व सल्लामसलतीचा उल्लेख करत सांगितले की, त्या वेळी प्राप्त झालेल्या १६१ सूचनांपैकी ९९ सूचना २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आल्या होत्या. मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांच्या सूचनांच्या आधारे सरकारने कृषी क्षेत्रासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. बनावट बियाण्यांची विक्री रोखण्यासाठी कठोर कायदे करण्यात आले असून सर्व बाजारांचे आधुनिकीकरण, सर्व पिकांसाठी गेट-पास प्रणालीची अंमलबजावणी, प्रत्येक जिल्ह्यात बियाणे चाचणी प्रयोगशाळांची स्थापना, नवीन उत्कृष्टता केंद्रांची निर्मिती आणि राज्यभर फलोत्पादन अभियानाचा विस्तार करण्यात आला आहे. यंदा प्राप्त झालेल्या सूचना अधिक व्यावहारिक, दर्जेदार आणि भविष्योन्मुख असल्याचे सैनी यांनी नमूद केले. सर्व सूचनांचा गांभीर्याने विचार केला जाईल, असे आश्वासन देत त्यांनी कृषी विकासासाठी अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये कोणतीही तडजोड होणार नाही, असे स्पष्ट केले. तसेच, २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात ज्यांच्या सूचना समाविष्ट केल्या जातील, त्या शेतकरी व तज्ज्ञांना विधानसभेत अर्थसंकल्प सादरीकरण पाहण्यासाठी विशेष आमंत्रण दिले जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## पिकातील तण घालविण्यासाठी करा योग्य नियोजन



भारतातील सर्वात महत्त्वाचे आणि मोठ्या प्रमाणावर लागवड होणारे भाजीपाला पीक आहे. तरीही या पिकाची वाढ संथ असते. कांद्याची मुळे उथळ आणि पाने अरुंद असल्यामुळे तणांशी स्पर्धा करणे कठीण जाते. तणांमुळे पोषकद्रव्ये, पाणी आणि सूर्यप्रकाश कांद्यापर्यंत पोहोचत नाहीत, आणि याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. काही वेळा या समस्येमुळे उत्पादनात ४० ते ८० टक्क्यांपर्यंत घट दिसून येते. कांदा पिकात तण नियंत्रण हे उत्पादन वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. पारंपरिक पद्धतीत शेतकरी हाताने निंदणी करून तण काढतात. ही पद्धत प्रभावी असली तरी खूप मेहनत लागते, जमिनीतील रोपे सहज खराब होऊ शकतात आणि मजूर न मिळाल्यास तण वाढते. त्यामुळे आता तण नियंत्रणासाठी रासायनिक तणनाशकांचा वापर उत्तम, सोपा आणि किफायतशीर पर्याय ठरतो.

उगवणपूर्व आणि उगवणपश्चात तणनाशकांचा वापर : कांद्याची लागवड झाल्यानंतर ३ दिवसांच्या आत उगवणपूर्व फवारणी करणे फायद्याचे ठरते. यामुळे कांद्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात तण वाढण्याची शक्यता कमी होते. त्यानंतर लागवडीच्या १२१५ दिवसांनी उगवणपश्चात फवारणी केल्यास उगवलेले तण प्रभावीपणे नष्ट होतात.

कांदा पिकासाठी प्रमुख तणनाशके : पेडीमेथालिन, ऑक्सिफ्लोरोफेन, प्रोपाक्विझाफॉप, स्विचालोफॉप आणि इतर निवडक तणनाशके. उगवणपूर्व फवारणी न झाल्यास तणांची संख्या वाढते आणि कांदा पीक प्रभावित होते. अशा परिस्थितीत उगवणपश्चात तणनाशकांचा वापर उत्पादन वाढवण्यासाठी उपयुक्त ठरतो आणि निंदणीवरील खर्चही कमी करतो.

तणनाशक फवारणी करताना याकडे लक्ष द्या : उगवणपूर्व फवारणी सपाट, डेकनरहित आणि ओलसर जमिनीवर करावी. फवारणीसाठी स्वतंत्र पंप वापरणे आवश्यक आहे. दोन वेगवेगळ्या तणनाशके किंवा इतर रसायने एकत्र मिसळू नका. फ्लॅट फॅन किंवा फ्लड जेट नोजल वापरा. लेबलवरील सूचना नीट वाचा आणि तज्ज्ञांचा सल्ला घ्या. एकाच तणनाशकाचा सतत वापर टाळा, अन्यथा तण प्रतिकारशक्ती मिळवतात.

अंश व्यवस्थापनासाठी उपाय : शिफारसी प्रमाणेच तणनाशकांचा योग्य मात्रा वापरा.जमिनीत सेंद्रिय खतांचा वापर केल्यास सूक्ष्मजीव वाढतात आणि तणनाशक जलद विघटतात.जमिनीची खोल नांगरट करणे उपयुक्त ठरते.योग्य फेरपालट पद्धती वापरल्यास तणांचा प्रादुर्भाव कमी होतो.

वेळेनुसार तण नियंत्रण : लागवडीनंतर ३ दिवसांत मकर गवत, विकटा, सावा, मोती दुधी, केला, कुंजर यांसारख्या तणांवर प्रभावी नियंत्रण मिळते.उगवणपश्चात (१२१५ दिवसांनी) चिकटा गवत, सम्था, राननाचणी, चाकवत, माठ यावर नियंत्रण मिळते.तज्ज्ञांचा असा सल्ला आहे की, कांदा पिकासाठी योग्य वेळेवर आणि योग्य पद्धतीने तणनाशकांचा वापर केला तर उत्पादन सुरक्षित राहते आणि मेहनत वाचते.

## मेळघाटी म्हशीला मिळाले थेट राष्ट्रीय मानांकन ; पशुपालकांना होणार फायदा

विदर्भाच्या डोंगराळ आणि जंगलांनी वेढलेल्या मेळघाट परिसरात पिढ्यानपिढ्या संगोपनात असलेल्या मेळघाटी म्हशीला अखेर राष्ट्रीय स्तरावर अधिकृत मान्यता मिळाली आहे. ही मान्यता केवळ एका पशुजातीपुरती मर्यादित नसून, विदर्भातील पशुपालकांच्या कष्ट, परंपरा आणि जीवनशैलीला मिळालेला सन्मान मानला जात आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषद अंतर्गत मेळघाटी म्हशीची स्वतंत्र जात म्हणून नोंद करण्यात आली असून, त्यामुळे महाराष्ट्राच्या नोंदणीकृत म्हशींच्या यादीत आता आणखी एका स्थानिक जातीची भर पडली आहे.

यापूर्वी महाराष्ट्रात नागपुरी, पंढरपुरी आणि मराठवाडी पूर्णाथडी या म्हशींच्या जाती अधिकृतपणे नोंदणीकृत होत्या. आता विदर्भातील मेळघाटी म्हशीचाही या यादीत समावेश झाल्याने संपूर्ण विदर्भासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. नवी दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमात केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांना मेळघाटी म्हशीचे पंजीकरण प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाला आयसीएआरचे वरिष्ठ अधिकारी, पशुसंवर्धन विभागाचे सचिव तसेच राष्ट्रीय पशु अनुवांशिकी संसाधन ब्युरोचे मान्यवर उपस्थित होते.या यशामागे अनेक संशोधक आणि तज्ज्ञांचे मोलाचे योगदान आहे. कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी पशु वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथील सहयोगी अधिष्ठाता डॉ. चैतन्य पावशे, प्रकल्प संशोधक डॉ. शैलेंद्र कुरळकर, डॉ. प्रवीण बनकर आणि डॉ. प्राजक्ता कुरळकर यांचे विशेष अभिनंदन केले. या संशोधकांनी मेळघाटी म्हशीच्या वैशिष्ट्यांचा शास्त्रीय अभ्यास करून तिचे महत्त्व राष्ट्रीय पातळीवर मांडले.



मेळघाटी म्हशीची ओळख आणि संगोपन : मेळघाटी म्हशीचे संगोपन प्रामुख्याने अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वतरांगांमधील धारणी आणि चिखलदरा तालुक्यांमध्ये केले जाते. या भागातील भटक्या आदिवासी आणि गवळी समाजासाठी ही म्हैस उपजीविकेचा मुख्य आधार आहे. स्थानिक भाषेत या म्हशीला 'पहाडी म्हैस' असेही म्हणतात.

तिचा रंग काळा व कुळकुळीत असतो, कातडी थोडी केसाळ असते, शिंगे मध्यम आकाराची व आतल्या बाजूने वळणारी असतात, तर कपाळ सपाट असते. मेळघाटी म्हैस डोंगराळ, दुर्गम आणि कठीण हवामानातही सहज तग धरते.

तिची उत्पादन आणि पुनरुत्पादन क्षमता चांगली आहे. या म्हशीच्या दुधातील स्निग्धांश सरासरी ७ टक्के असून, त्यापासून तयार होणारा खवा आणि तूप चवीला उत्कृष्ट असते. विशेष म्हणजे मेळघाटी म्हशीच्या खव्याला स्थानिक बाजारात स्वतंत्र ओळख आणि चांगली मागणी आहे.मानांकनाचा पशुपालकांना फायदा : मेळघाटी म्हशीला अधिकृत जात म्हणून मान्यता मिळाल्यामुळे आता पशुपालकांना शासनाच्या विविध योजना, अनुदान, संवर्धन आणि सुधार प्रकल्पांचा थेट लाभ मिळणार आहे. यामुळे या स्थानिक जातीचे जतन होईल, तिची शास्त्रीय पद्धतीने वाढ होईल आणि पशुपालकांचे आर्थिक उत्पन्नही वाढण्यास मदत होणार आहे. एकंदरीत, मेळघाटी म्हशीच्या राष्ट्रीय मानांकनामुळे विदर्भाच्या पशुधन परंपरेला नवी ओळख मिळाली असून, ही मान्यता स्थानिक पशुपालकांसाठी आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८८ : इंग्लडमधून हद्दपार केलेले गुन्हेगार वसाहतीसाठी ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्सच्या किनार्यावर उतरले. इथे वसाहत करण्यासाठी तयार झालेल्या गुन्हेगारांची शिक्षा माफ करण्यात आली होती.
१८४१ : ब्रिटिशांनी हाँगकाँग बेटाचा ताबा घेतला.
१९३७ : फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट यांनी अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून अमेरिकेच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली. यानंतर २० जानेवारीलाच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा शपथविधी करण्याची प्रथा पडली.
१९४४ : दुसरे महायुद्ध  रॉयल एअर फोर्सने बर्लिनवर २३०० टन बॉम्बवर्षाव केला.
१९४८ : महात्मा गांधींची हत्या करण्याचा चौथा प्रयत्न झाला. याआधी १९३४, १९४४ व १९४४ मध्ये त्यांची हत्या करण्याचे प्रयत्न झाले होते.
१९५७ : आशियातील पहिली अणुभट्टी पंतप्रधान पंडित जवाहरलालनेहरू यांच्या हस्ते देशाला अर्पण करुन अ‍ॅटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट (सध्याचे नाव भाभा अणुसंशोधन केंद्र) या संस्थेची स्थापना करण्यात आली.
१९६३ : चीन व नेपाळ या देशांत सरहद्दविषयक करार झाला.
१९६९ : क्रॅब नेब्युलात प्रथमत: पल्सार दिसून आला.
१९९८ : संगीत क्षेत्रातील नोबेल समजला जाणारा 'पोलार संगीत पुरस्कार' विख्यात सतारवादक पं. रविशंकर यांना जाहीर
१९९९ : गिरीश कर्नाड यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर
२००९ : अमेरिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांचा शपथविधी झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७५ : आंद्रे ॲम्पिअर  फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १० जून १८३६)
१८६१ : मराठीमधील पहिल्या स्त्री कथा-कादंबतीकार, निबंधकार आणि सुधारक काशीबाई गोविंदराव कानिटकर यांचा जन्म.
१८७१ : सर रतनजी जमसेटजी टाटा  टाटा घराण्यातील उद्योगपती व दानशूर व्यक्ति (मृत्यू: ५ सप्टेंबर १९१८)
१८८९ : महान देशभक्त आणि तपस्वी मसुरकर महाराज यांचा जन्म.
१८९८ : कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर तथा 'मास्टर कृष्णराव' प्रतिभावान गायक, अभिनेते व संगीतकार, त्यांच्या गायनात ग्वाल्हेर, आग्रा व जयपूर घराण्यांचा संगम दिसून येई. 'वंदे मातरम'ला त्यांनी दिलेली चाल लोकप्रिय ठरली. (मृत्यू: २० आक्टोबर १९७४)
१९३० : चंद्रावर उतरणारे दुसरे अमेरिकन अंतराळवीर बझ आल्ड्रिन यांचा जन्म.
१९६० : आपा शेर्पा  १९ वेळा माऊंट एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करणारे नेपाळी गिर्यारोहक


### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९१ : डेविड कालाकौआ  हवाईचा राजा (जन्म: १६ नोव्हेंबर १८३६)
१९३६ : जॉर्ज (पाचवा)  इंग्लंडचा राजा (जन्म: ३ जून १८६५)
१९५१ : अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर ऊर्फ 'ठक्कर बाप्पा' समाजसेवक (जन्म: २९ नोव्हेंबर १८६९)
१९८० : कस्तुरभाई लालभाई  दानशूर व राष्ट्रवादी विचारसरणीचे उद्योगपती, पद्मभूषण (१९६९), रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक (१९३७  १९४९). अरविंद मिल्स, अशोक मिल्स, अतुल असे अनेक गिरण्या व कारखाने त्यांनी चालू केले. आपल्या गिरण्यांत त्यांनी कामगार कल्याणासाठी सहकार संस्था काढल्या. (जन्म: १९ डिसेंबर १८९४)
१९८८ : खान अब्दुल गफार खान तथा 'सरहद गांधी' (जन्म: ३ जून १८९०)
१९९३ : ऑड्रे हेपबर्न  ब्रिटिश अभिनेत्री, संयुक्त राष्ट्रांच्या बालक निधीच्या सदिच्छा प्रतिनिधी, 'रोमन हॉलिडे' या चित्रपटातील अभिनयाबद्दल त्यांना ऑस्कर पुरस्कार मिळाला. (जन्म: ४ मे १९२९)
२००२ : रामेश्वरनाथ काओ  रिसर्च अँड ॲनॅलेसिस विंग () या भारतीय गुप्तचर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष. काओ यांना भारतीय गुप्तचर यंत्रणेचे अध्वर्यू मानण्यात येते. (जन्म: १० मे १९१८)

## गव्हावरील मावा नियंत्रणाच्या सोप्या पद्धती

गहू पीक सध्या वाढीच्या अवस्थेमध्ये आहे. परंतु अनेक भागात गव्हावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. काही दिवस वातावरण ढगाळ राहिल्याने मावा किडीची संख्या झपाट्याने वाढलेली आहे. त्यामुळे पिकाची वाढ खुंटून उत्पादनात लक्षणीय घट होते. मावा या रस शोषक किडीसाठी पारंपरिक, जैविक आणि रासायनिक पद्धतीने नियंत्रण मिळवणे सोपे होते.

किडीची ओळख : मावा ही किडीची गव्हावरील विशिष्ट जात जवस, ओट्स व राई या पिकांवर आढळते.या किडीचे पंखविरहित व पंखधारी असे दोन्ही प्रकार आढळतात. पंखविरहित मावा किडीची पिले हिरवी किंवा लालसर असतात, तर प्रौढ मावा प्रामुख्याने हिरव्या अथवा तपकिरी रंगाचा दिसतो. प्रौढ मावा किडीचे त्याचे शरीर दोन्ही टोकांना निमुळते, सुईसारखे



असते. तर पंखधारी मावा हिरवा किंवा तपकिरी असून, त्याची लांबी साधारण १.६ ते २.९ मि.मी. इतकी असते. या प्रकारात पोटाच्या वरच्या बाजूस असलेले खंडांमधील काळसर ठिपके अथवा रेषा स्पष्टपणे दिसून येतात, हे या किडीची महत्त्वाची ओळख आहे.

असे होते नुकसान : ही कीड गव्हाच्या कोवळ्या पानांवर व ओंब्यांवर समूहाने राहून रस शोषते. किडीची पिल्ले आणि प्रौढ दोन्ही गव्हाच्या पानांवर व ओंबीतून रस शोषतात. त्यामुळे पाने पिवळी पडतात, पिकाची वाढ मंदावते आणि ओंबीतले दाणे नीट भरत नाहीत. कधी कधी दाण्यांचे वजनही कमी होते आणि एकूण उत्पादन घटते. ही कीड गोड व चिकट द्रव (हनीड्यू) सोडते. त्यावर काळी बुरशी वाढते, त्यामुळे पानांवर सूर्यप्रकाश नीट पडत नाही आणि अन्न तयार होण्याची प्रक्रिया कमी होते. परिणामी पीक अशक्त होते, हळूहळू सुकू लागते आणि वाळल्यासारखे दिसते. एका झाडावर १० पेक्षा जास्त मावा किड दिसल्यास पिकाने आर्थिक नुकसानीची पातळी गाठली आहे असे समजते.

एकात्मिक व्यवस्थापन : शेत तणविरहित ठेवून कायम स्वच्छता राखावी. नत्रयुक्त खतांचा संतुलित वापर करावा. गहू पिकाला कोणत्याही अवस्थेत पाण्याचा ताण पडू देऊ नये. प्रति एकर १० ते १२ पिवळ्या चिकट सापळ्यांचा वापर करावा. शेतामध्ये शक्य झाल्यास ढालकीड, ग्रीन लेसविंग्स, सिरफिड माशी, ॲफिडियस प्रजाती, ॲफेलिनस प्रजाती या सारख्या उपयुक्त मित्रकीटकांचे संवर्धन व संरक्षण करावे.

जैविक नियंत्रण : जैविक पद्धतीमध्ये लेकॅनिसिलियम लेकॅनी या बुरशीजन्य कीटकनाशकाच्या ४ ते ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात १० ते १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. या नियंत्रण पद्धती गहू संशोधन केंद्र येथील गहू पैदासकार डॉ. निलेश मगर, आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठातील पीएचडी संशोधक रविंद्र पालकर यांनी शिफारस केल्या आहेत.

रासायनिक नियंत्रण : किडीने आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यावर पुढील पैकी एका कीटकनाशकाची फवारणी करावी. क्विनॉलफॉस (२५ टक्के ई.सी.) १ ते २ मि.लि. किंवा थायामेथोक्झाम (२५ टक्के डब्ल्यू.जी.) ०.१ ग्रॅम किंवा संयुक्त कीटकनाशकांमध्ये बीटा-सायफ्लुथ्रिन (८.४९ टक्के) अधिक इमिडाक्लोप्रिड (१९.८१ टक्के ओ.डी.) हे कीटकनाशक ०.८ मि.लि. याची फवारणी करावी. या फवारण्यांपैकी कोणतीही एक फवारणी एक लिटर पाण्यात मिसळून तज्ज्ञांच्या सल्ल्याने करावी.

मंगळवार दि.२० जानेवारी २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# भास्कर दानवे यांचा घरोघरी भव्य सत्कार

## माझा विजय हा जनतेचा विजय आहे-भास्कर आबा दानवे

जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भास्कर आबा दानवे यांनी मोठ्या मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला. या ऐतिहासिक विजयानंतर छ.शिवाजीनगर म्हाडा कॉलनी परिसरात त्यांचा भव्य सत्कार आयोजित करण्यात आला. कॉलनीतील नागरिकांनी आणि विशेषतः महिलांनी दानवे यांचे औक्षण करत फुलांची उधळण व शुभेच्छांचा वर्षाव केला. या वेळी संपूर्ण परिसर जल्लोषात न्हाऊन निघाला, भास्कर आबा दानवे यांच्यासोबत नवनिर्वाचित नगरसेवक सुशीलाताई दानवे,



कल्याण भदनेकर, ज्योती सले, पदमा मानधनी यांची उपस्थिती होती. सत्कारप्रसंगी महिलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. महिलांनी औक्षण करून ''प्रभागाच्या विकासासाठी आम्ही सदैव तुमच्या पाठीशी आहोत'' असा विश्वास व्यक्त केला. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विजयाचा आनंद साजरा केला.

या वेळी बोलताना भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास टाकला, तो मी कधीही तुटू देणार नाही. विकास थांबणार नाही. प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा, स्वच्छता, स्ट्रीटलाईट, उद्याने तसेच महिलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा या सर्व बाबींना प्राधान्य दिले जाईल.''ते पुढे म्हणाले की, ''प्रभागातील रखडलेली विकासकामे मार्गी लावली जातील. मूलभूत सुविधांबरोबरच शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छतेवर विशेष लक्ष दिले जाईल. मला निवडून दिल्याबद्दल मी सर्व नागरिकांचा मनापासून आभारी आहे. हा विजय माझा नसून प्रभागातील प्रत्येक नागरिकाचा आहे. या कार्यक्रमास छ.शिवाजीनगर म्हाडा कॉलनीतील नागरिक, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जल्लोष, घोषणाबाजी आणि अभिनंदनाच्या शुभेच्छांमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## शिवाजी हायस्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन



जालना । प्रतिनिधी

शिवाजी हायस्कूल रामनगर साखर कारखाना येथे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात पार पडले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजी शिक्षण मंडळाच्या श्रीमती पुष्प लताताई चव्हाण तसेच प्रमुख पाहुणे वसंत घुगे हे .होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलाने झाली तसेच प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री विलास वायाळ यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली व त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते लावणी तसेच भारुड, व जादूचे प्रयोग, नाटिका सादर केले. यावेळी विद्यार्थ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. कार्यक्रमाला विद्यार्थी पालक तसेच परिसरातील मंडळी होती. कार्यक्रमाचे संचालन श्री खंडागळे व चव्हाण यांनी केले तसेच आभार प्रदर्शन वाघ यांनी केले याप्रसंगी पर्यवेक्षक श्री शिंदे सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## मद्यपी पतीच्या जाचाला कंटाळून विवाहितेने सपवले जीवन

छत्रपती संभाजीनगर

मद्यपी पतीच्या त्रासाला कंटाळून २९ वर्षीय विवाहितेने गळफास घेतला. तिला तात्काळ एमजीएममध्ये भरती करण्यात आले. मात्र उपचारदरम्यान तिचा मृत्यू झाला. ज्योती अमोल साळवे (२९) असे आत्महत्या करणाऱ्या विवाहितेचे नाव आहे. तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी पती अमोल माणिकराव साळवे (रा. न्यायनगर) याच्याविरुद्ध पुंडलिकनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला पोलिसांनी अटक केली असून, २२ जा नेवारीपर्यंत न्यायालयाने त्याला पोलिस कोठडी सुनावली आहे.

ज्योतीचे वडील सोमीनाथ भीमराव सिरसाठ (५२, रा. सिरसगाव मंडप, ता. भोकरदन, जि. जालना) यांच्या फिर्यादीनुसार, ज्योती व अमोलचे लग्न सन २०१६ मध्ये झाले होते. गेल्या सहा वर्षांपासून अमोल दारूच्या नशेत घरगुती कारणांवरून ज्योतीला मारहाण करायचा. तिच्यावर संशय घेऊन तिचा वारंवार अपमान करून शिवीगाळ करीत होता. तसेच तू फाशी घेऊन मर, असे म्हणत तिला वारंवार हिनवत होता. या छळामुळे ज्योती अनेक वेळा माहेरी येऊन राहत होती. यापूर्वी पाच ते सहा वेळा मारहाण झाल्यानंतरही नातेवाइकांनी आणि गावातील नागरिकांनी समजूत काढून तिला सासरी पाठवले होते. ऑक्टोबर २०२५ मध्ये मध्यस्थीच्या बैठकीत अमोल साळवे याने सर्वांसमोर आपली चूक मान्य करून यापुढे त्रास देणार नाही, असे आश्वासन दिले होते. त्यानंतर ज्योती पुन्हा न्यायनगर येथील सासरी नांदण्यास गेली होती. मात्र त्यानंतरही तिच्या त्रास कायम सुरूच होता.

## तुरीच्या खराब बियाण्यामुळे शेतकऱ्याचे लाखोचे नुकसान

### भरपाई न मिळाल्यास ग्राहक मंच मध्ये जाणार

अंबड । प्रतिनिधी

तुरीचं खराब बियाण्यामुळे शेतकऱ्याची लाखो रुपयाचे नुकसान झाली आहे अंबड तालुक्यातील कर्जत येथील शेतकऱ्याची नुकसान झाले असून कंपनीकडून नुकसान भरपाई ना मिळाल्यास ग्राहक मंच मध्ये धाव घेणार आहे. अशी तक्रार कृषी विभागाकडे करण्यात आली तसेच नुकसान चा पंचनामा कृषी विभागाच्या वतीने करण्यात आला आहे.



राधाकिसन पंढरीनाथ डोंगरे यांचे गट क्र २२३मध्ये दोन हेक्टर शेतीमध्ये श्रीराम कंपनीचे मुन्नी तुरीचे वाण लावलेले होते. परंतु बियाणे खराब असल्याने शेतकऱ्याची खुप मोठी नुकसान झाली असून त्यामुळे आत्महत्या करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. तश शेतकऱ्यांनी लेखी तक्रार दिली असता कंपनीचे व कृषी ऑफीस चे कृषी सहाय्यक श्री औटे यांनी पंचनामा केलेला आहेत. परंतु रामा आओ बेनिटीक्स कंपणीचे तुर वान (मुन्नी) हे बियाणे बोगस निघाल्यामुळे नुकसान झाली आहे. मशागत खत औषध हे सगळं करून नुकसान झाली. १८/६/२०२५ शिगे हंगामा साठणे मी अंबड येथील एका दुकानामधून राम्र आग्रो कंपनीचे तुर बियाणे वाण (मुली) या जातीचे १ किलो वजनाचे ३ पाकीट देण्यात आले होते. सदरील पाकीट मधील बियाणं नियमाप्रमाणे लावणी पेरणी करण्यात आली होती या नुकसानीमुळे लाखो रुपयाची नुकसान झाली असे शेतकऱ्याचे म्हणणं आहे.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.५६८/२०२६**
**परमेश्वर नामदेव जगताप विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय भवानवाडी**

पहा

परमेश्वर नामदेव जगतापरा. भवानवाडी ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक प्रियंका परमेश्वर जगताप यांचा दिनांक २४/१२/२०१० रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस भवानवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे भवानवाडी ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १३/०१/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १६३/०२/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

## धान्य ते माय बाप ज्यांच्या घरी संत जन्म घेती :-श्रावण महाराज जगतप

### नाथांच्या तपाने पुनीत झालेली भूमी गोरक्षनाथ टेकडी

बीड । प्रतिनिधी

जगात सर्वात भाग्यवान कोण असेल तर ते साधू संतांचे आई वडील आहेत आज ज्या आई वडिलांनी संत साधू बाबा यांना जन्म दिला ज्या आई वडिलांनी किसान बाबा व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांना जन्म दिला ते आई वडिलांचे भाग्य सर्वात मोठे आहे. ज्या आई वडिलांनी जगाच्या कल्याणासाठी आपल्या लेकरांना समाजासाठी अर्पण केलं ते आई वडिलांनी खरंच भाग्यवंत आहेत.असे अभंग विवेचन करताना ह भ प श्रावण महाराज जगताप यांनी धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन सेवा अर्पण करताना व्यक्त केले



आई वडिलांनी पैसाच्या मागे लागून आयुष्य खर्च करण्यापेक्षा आपल्या मुलांना वेळ देणं गरजेचे आहे मुलांवर संस्कार करणे आवश्यक आहे त्या मुळे आपला आचरण मुलं करत असतात आई वडिलांनी आचरण सुसंकृत असले पाहिजे मुल नेहमी मोठ्याच आचरण करतात. समाजात अनेक माणसं आई वडिलांनी आश्रमात सोडतात व अनेक ठिकाणी देव सापडतात लाखो रुपये खर्च करत देव हा आपल्या आई वडिलांच्या सेवेत आहे आई वडिलांची सेवा हिच ईश्वर सेवा आहे. आज दि.२० जानेवारी मंगळवार रोजी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सांगता गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांचे १० ते ११ प्रवचन व ह भ प अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे कीर्तन दुपारी १२ ते ०२ वेळेत संपन्न होणार आहे. क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सांगता व महाप्रसादाच्या महापंक्ती होणार.

## ग्रंथपाल प्रा. सुभाष लांडगे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

परळी । प्रतिनिधी

ग्रंथपाल प्रा. सुभाष लांडगे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांनी पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांचा पीएच.डी. प्रबंध ''कम्युनिटी इन्फॉर्मेशन सर्विसेस फॉर रुरल पीपल अँड इंटिग्रेटेड स्टडी ऑफ मराठवाडा रीजन'' या विषयावर आधारित असून, ग्रामीण समाजासाठी माहिती सेवांचे महत्त्व व मराठवाडा विभागातील त्याचे एकत्रित अध्ययन या संशोधनातून अधोरेखित करण्यात आले आहे.



या संशोधन कार्यासाठी रिसर्च गाईड म्हणून प्रा. डॉ. शिवशंकर घुमरे यांनी मार्गदर्शन केले. प्रबंधाचे रेफ्री म्हणून डॉ. बाळू मुखदयाल तसेच डॉ. कापरडे व्ही. एस. (डीन) यांनी काम पाहिले, तर विभाग प्रमुख म्हणून डॉ. शशांक सोनवणे यांनी सहकार्य केले. प्रा. लांडगे यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ. दीपाताई क्षीरसागर, संस्थेचे सचिव डॉ. योगेश भारतभूषण क्षीरसागर, संचालिका डॉ. सारिकाताई क्षीरसागर तसेच संस्था प्रशासनातील पदाधिकारी डॉ. विश्मभर देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. सिद्धार्थ जाधव यांनी अभिनंदन केले. याचबरोबर प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**मा. श्रीमती ए बी निवारे १० वे सह दिवाणी न्यायाधीश, व स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ९५/२०२६**
**ॲड.एस. आर. पाखरे**
**वानरसाबाई विरुध्द निरंक**

अर्जदार : १) वानरसाबाई सहदेव मुंडे, वय ६३. धंदा घरकाम, रा. इंडिया बँक कॉलनी, कॅनॉल रोड, बीड ता. जि. बीड २) गणेश सहदेव मुंडे, वय ४२. धंदा शेती रा. इंडिया बैंक कॉलनी, कॅनॉल रोड, बीड ता. जि. बीड ३) संतोष सहदेव मुंडे वय ४०, धंदा शेती रा. इंडिया बँक कॉलनी, कॅनॉल रोड, बीड ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सहदेव कोंडीबा मुंडे रा. इंडिया बैंक कॉलनी, कॅनॉल रोड, बीड ता. जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत सहदेव कोंडीबा मुंडे रा. इंडिया बैंक कॉलनी, कॅनॉल रोड, बौड ता. जि. बीड यांचा मृत्यु दि. १९.११.२०२५ रोजी कौडगाव ब्र वडवणी येथे झाला आहे. अर्जदार १ ही मयताची पत्नी असुन क. २ व ३ हे मयताची मुल आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरछु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सहदेव कोंडीबा मुंडे रा. इंडिया बैंक कॉलनी, कॅनॉल रोड, बीड ता. जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात बेईल याची नोंद घ्यावी. दिले.

आज दिनांक १७ माहे जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २३ फेब्रुवारी २०२६.

स्वाक्षरित
क. लिपीक

**आदेशावरुन.**
**स्वाक्षरीत**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर. बीड.**

जाहीर प्रगटन

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२०/२०२६,**
**ॲड. एस. आर. पाखरे यांच्यामार्फत**
**अंगद पि. नवनाथ शिंदे वि. निरंक**

ज्यापेक्षा रत्नमाला भ्र. नवनाथ शिंदे हे दिनांक १२.१०.२०२५ रोजी केसापुरी परभणी, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार १. अंगद पि. नवनाथ शिंदे, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. केसापुरी परभणी, ता.जि. बीड. ह.मु. धायरी गाव, पुणे शहर, ता.जि. पुणे. २. किसकिंदा भ्र. बालासाहेब राऊत, वय ४७ वर्षे, चंदा घरकाम, रा. केज, ता. केज, जि. बीड ३. आयोध्या भ्र. शिवाजी राऊत, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. बार्शी नाका, ढगे कॉलनी, बीड, ता.जि बीड ४. गोदावरी भ्र. खंडू फुटाणे, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. तेलगाव बु., ता. धारूर, जि. बीड

अर्जदार क्रं. १ ही मयत नामे रत्नमाला भ्र. नवनाथ शिंदे यांचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. २ ते ४ या मयताच्या विवाहित मुली आहेत. मयताचे पती नामे नवनाथ आनंतराव शिंदे हे ब-याच वर्षापूर्वी मयत झालेले आहेत, या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविध्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हणाबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत रत्नमाला भ्र. नवनाथ शिंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २६/०२/२०२६ आहे.

आज दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित
क. लिपीक

**आदेशावरुन.**
**स्वाक्षरीत**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर. बीड.**

## पडीक जमीन विकास काळाची गरज- डॉ.वानखेडे

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित, वसंतदादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे चुंबळी येथे'' युवा व शाश्वत विकास विशेष लक्ष पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास '' या उपक्रमानुसार राष्ट्रीय सेवा योजना सात दिवशीय विशेष शिबीर मौजे चुंबळी ता. पाटोदा जि. बीड येथे सुरू आहे. या शिबिरामध्ये पाचव्या दिवशीच्या उपक्रमात सकाळच्या सत्रामध्ये चुंबळी शिवारात वनराई बंधारा बांधण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थी स्वयंसेवकांनी श्रमदान केले.



दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये वसंतदादा पाटील महाविद्यालयातील राज्यशास्त्रविभाग प्रमुख प्रा. डॉ. उमाकांत वानखेडे यांचे 'पडीक जमीन विकास' या विषयावरील व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून वसंतदादा पाटील महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा.प्रदीप मांजरे हे लाभले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जालिंदर लोणके यांनी केले. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानामध्ये प्रा. डॉ. उमाकांत वानखेडे यांनी विषयी मार्गदर्शन करतांना म्हटले की , युवकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पडीक जमीन विकसित करावी, आज जमिनीचे संरक्षण व संवर्धन करणे महत्वाचे आहे. आज जगामध्ये वहिती जमिनीपेक्षा पडीक जमिनीचे प्रमाण जास्त आहे, हे सर्व शेती विकसित केल्यास कोणताही देशात अन्न धान्याची टंचाई भासणार नाही.अशा प्रकारचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपामध्ये प्रा. प्रदीप मांजरे यांनी, पडीक जमिनीचा विकास करण्यासाठी विविध उपाय योजनांची माहिती दिली. पडीक जमिनीचा विकास करण्यासाठी, जमिनीची धूप थांबवून, वृक्ष लागवड करून जल व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, असे वक्तव्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विनोद उगले यांनी केले, तर प्रमुख अतिथी आणि उपस्थितांचे आभार कु. वैष्णवी बांगर या विद्यार्थिनीने मानले. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका मनिषा गाडवे प्रा. डॉ. जालिंदर लोणके , प्रा. प्रदीप मांजरे,डॉ. चंद्रशेखर बनसोडे, प्रा. गोकुळ कंठाळे , याशिवाय राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक शिबिरार्थी कु.अमृता मकाळ,अजय लगस,चंद्रभान पवार, कु. रोशनी तागड कु. प्राजक्ता सानप, सचिन गवळी, प्रवीण वनवे, प्रसाद खाडे, यशराज वराट, कु. श्रेया खंडागळे, कु. भारती बांगर , कु. ऋतुजा बांगर इत्यादिंनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात हेल्मेट सक्ती मोहीम सुरू

## वाहतूक शाखेने १८० कर्मचाऱ्यांना केला एक लाख ८० हजाराचा दंड

**बीड । प्रतिनिधी**

**पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यामध्ये सोमवारपासून शासकीय कर्मचारी आणि पोलीस कर्मचाऱ्यावर हेल्मेट सक्तीची मोहीम सुरू करण्यात आली असून जिल्हाभरात जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने १८० कर्मचाऱ्यावर कारवाई करून त्यांच्याकडून एक लाख ८० हजार रुपयांचा दंड वसूल केला. याचबरोबर जे कर्मचारी पहिल्याच दिवशी हेल्मेट घालून दुचाकी वर आले त्यांचे गुलाबाचे फुल देऊन पोलीस अधिकाऱ्यांनी स्वागत केले. ही कारवाई सतत चालूच राहणार असल्याची माहिती जिल्हा वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप यांनी दिली.**





बीड जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण पाहता जवळपास ९०% अपघात हेल्मेट नसल्याने होतात असे निरीक्षण जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांनी नोंदवल्याने बीड जिल्ह्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी हेल्मेट घालूनच दुचाकी वर कार्यालयात यावे असे आदेश पोलीस अधीक्षकांनी पारित केले आहेत. यात पोलीस कर्मचारी आणि इतर शासकीय कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी करण्यासाठी बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा वाहतूक शाखेला जबाबदारी देण्यात आली असून प्रत्येक शासकीय कार्यालयामध्ये एक अधिकारी आणि पाच कर्मचाऱ्यांची टीम तपासणीसाठी राहणार आहे. हेल्मेट सक्तीच्या पहिल्याच दिवशी सोमवारी जिल्हाभरात जिल्हा वाहतूक शाखेच्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोहीम राबवून जवळपास १८० शासकीय कर्मचाऱ्यांना विना हेल्मेट पकडून त्यांच्याकडून एक लाख ८० हजाराचा दंड वसूल केला. याबरोबरच जे कर्मचारी पहिल्याच दिवशी हेल्मेट घालूनच कार्यालयात आले. त्यांचे पोलीस अधिकाऱ्यांच्या वतीने गुलाबाचे फुल देऊन स्वागत करण्यात आले. या कारवाईबद्दल पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत असून आगामी काळातही मोहीम चालूच राहणार असल्याची माहिती जिल्हा वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप यांनी दिली.

## आष्टीत हेल्मेट नसलेल्या १० शासकीय कर्मचाऱ्यांवर कारवाई

**आष्टी । प्रतिनिधी**

**शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे बंधनकारक केले आहे. या आदेशाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर आज आष्टी शहरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.**



ही कारवाई पो हे का विलास गुंडाळे,पो हे का नागेश लोमटे व पो हे का नितीन काकडे आष्टी तालुका पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपासणीदरम्यान तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय तसेच इतर शासकीय कार्यालयांतील हेल्मेट न वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

यावेळी बोलताना नागेश लोमटे यांनी माहिती दिली की, "शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार शासकीय कर्मचाऱ्यांनी दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे बंधनकारक आहे. आजच्या तपासणीत हेल्मेट नसलेल्या एकूण १० कर्मचाऱ्यांवर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे शहरातील शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, पुढील काळात हेल्मेट वापराबाबत अधिक काटेकोर अंमलबजावणी केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. रस्ते अपघात टाळण्यासाठी व स्वतःच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येकाने नियमांचे पालन करावे, असे आवाहन आष्टी तालुका पोलीस निरीक्षक शरद भुतेकर केले.

## पाटोद्यात हेल्मेट सक्तीचा शासकीय कर्मचाऱ्यांना दणका

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत राणावत यांनी दिलेल्या आदेशानुसार, पाटोदा शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध विशेषतः हेल्मेट न वापरणाऱ्यांविरुद्ध कडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. हेल्मेट नाही, तर प्रवेश नाही अशा कडक पवित्र्यात पोलीस प्रशासनाने आता थेट शासकीय कार्यालयांच्या बाहेरच आपली पथके तैनात केली आहेत.

**कोणाचीही गय नाही; अधिकारीही रडावर**

या मोहिमेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये कोणालाही सवलत दिली जात नाहीये. पाटोदा पोलीस स्टेशनचे पीएसआय पवार,



सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कल्याण बाबासाहेब तांदळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही मोहीम राबवताना सामान्य नागरिकांसोबतच शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई केली आहे. नियम सर्वांसाठी सारखेच आहेत, हा संदेश यातून प्रशासनाने दिला आहे.

**अपघात रोखण्यासाठी पाऊल**

दुचाकी अपघातांमध्ये होणाऱ्या जीवितहानीचे प्रमाण चिंताजनक आहे. हे मृत्यू रोखण्यासाठी हेल्मेट वापरणे केवळ कायदेशीर बंधन नसून तो एक प्रभावी जीवनरक्षक उपाय आहे, अशी जनजागृतीही पोलिसांकडून केली जात आहे. केवळ दंड वसूल करणे हा उद्देश नसून, नागरिकांमध्ये सुरक्षेची सवय रुजवणे हा या मोहिमेचा मुख्य हेतू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**मोहीम सातत्याने सुरू राहणार**

पाटोदा पोलिसांनी आवाहन केले आहे की, नागरिकांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी घराबाहेर पडताना हेल्मेटचा वापर करावा. पोलीस अधीक्षक नवनीत राणावत यांच्या सूचनेनुसार ही मोहीम भविष्यातही सातत्याने आणि अधिक कठोरपणे राबवण्यात येणार आहे. त्यामुळे आता पाटोदाकरांना विना-हेल्मेट फिरणे महागात पडणार आहे.

## आष्टीत आधार दिव्यांग पुनर्वसन केंद्र मार्फत विविध साहित्याचे वाटप

आष्टी प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आधार केंद्र शासन पुरस्कृत अपंग पुनर्वसन केंद्र बीड आष्टी यांच्यावतीने मकर संक्राती निमित्त दिव्यांग



मुलीना वेगवेगळ्या साहित्याचे वाटप संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे यांच्या हस्ते करण्यात आले.केंद्र शासन पुरस्कृत असलेल्या आधार दिव्यांग पुनर्वसन केंद्र बीड आष्टी यांच्यावतीने गेल्या दोन वर्षापासून दिव्यांग बांधवांसाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जातात दिव्यांग बांधवांना मदत करून त्यांच्या अडीअडचणी सोडवणे व दिव्यांग बांधवांचे पुनर्वसन कसे करता येईल यासाठी ही संस्था दिव्यांग क्षेत्रामध्ये गेल्या अनेक वर्षापासून काम करत आहे यावर्षी मकर संक्रांतीच्या सणानिमित्त खास दिव्यांग विद्यार्थिनींना विविध साहित्य वाटप करण्यात आले या कार्यक्रमासाठी कार्यक्रमासाठी छत्रपती शाहू महाराज अपंग विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय ◀◀ पान ३ वर

## कृष्णा गायकवाडची अंडर-१४ महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा होतकरू खेळाडू कृष्णा गायकवाड याची १४ वर्षांखालील (अंडर-१४) महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली असून, या उल्लेखनीय यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कृष्णा गायकवाडने सातत्यपूर्ण मेहनत, शिस्तबद्ध सराव आणि उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर राज्य संघात स्थान मिळवले आहे.

कृष्णा गायकवाडच्या या यशाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर, डॉ. योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम यांच्यासह महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, जैतुल्ला खान, सिद्दीक देशमुख, संजय उडान, शुभम धुत, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख आदी पदाधिकारी व सदस्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. कृष्णा गायकवाडची ही निवड बीड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद असून, भविष्यात तो राज्य व राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करेल, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.



## नवनिर्वाचित नगरसेवकासोबत असभ्य वर्तन

### स्वच्छता निरिक्षकाच्या बदलीसाठी लोकविकास महाआघाडी आक्रमक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक ॲड.विकास काकडे यांना स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे यांनी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनातच अर्वाच्य भाषेत बोलून अपमानित केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शहरातील झाडांच्या निगा राखण्याबाबत चर्चा करण्यासाठी गेलेल्या लोकप्रतिनिधीचा अपमान झाल्यामुळे लोकविकास महाआघाडी आक्रमक झाली आहे.

याप्रकरणी संबंधित निरीक्षकावर तात्काळ कायदेशीर कारवाई करून त्यांची बदली करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा लोकविकास महाआघाडीने मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. यावेळी लोकविकास महाआघाडीचे प्रमुख राजकिशोर मोदी,गटनेते सय्यद ताहेर आदीसह नगरसेवक उपस्थित होते.

## सिनियर डिव्हिजन मंजुरीबद्दल आ.सुरेश धस यांचे वकील संघाकडून आभार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्याच्या न्याय व्यवस्थेला ऐतिहासिक बळ देणाऱ्या सिनियर डिव्हिजन (उपजिल्हा) न्यायालय मंजुरीच्या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आष्टी वकील संघाच्या वतीने लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे जाहीर आभार मानण्यात आले.



आष्टी न्यायालयास उपजिल्हा न्यायालयाची मंजुरी मिळाल्यामुळे तालुक्यासह परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, यापुढे न्यायप्रक्रियेसाठी जिल्हा ठिकाणी जाण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यामुळे नागरिकांचा वेळ, खर्च व श्रम वाचणार असून न्याय अधिक सुलभ, जलद आणि प्रभावीपणे मिळण्यास मदत होणार आहे.

हा निर्णय सामान्य नागरिक, वकील वर्ग तसेच संपूर्ण न्यायालयीन कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरणार असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी आयोजित कार्यक्रमास वकील संघाचे अध्यक्ष ॲड. ताहेर साहेब, सचिव ॲड. उद्धव पोकळे, ज्येष्ठ विधीतज्ज्ञ बाबूराव अनारसे, रावसाहेब जगताप आबा, श्रीकृष्ण देशपांडे, ◀◀ पान ३ वर

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटामाटात संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित "शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडिक जमीन विकासासाठी युवा शक्ती" या विषयावरील राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन समारंभ आज मोठ्या थाटामाटात पार पडला. या शिबिराच्या माध्यमातून ग्रामविकास, जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण तसेच विविध सामाजिक जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजनेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्वांनी राष्ट्रीय सेवा योजना गीत व राष्ट्रगीत म्हणत कार्यक्रमास प्रेरणादायी वातावरण निर्माण केले. पुढे कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा समन्वयक डॉ. रवी सातभाई यांनी केले. त्यांनी शिबिरामागील उद्दिष्टे स्पष्ट करत शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन आणि पडिक जमीन विकास या विषयांच्या अनुषंगाने शिबिरातील सात दिवसांचे उपक्रम व लोकसहभागाचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली.

यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या पूजनानंतर उद्घाटनपर भाषणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती ◀◀ पान ३ वर

## जिवंतपणीही संघर्ष आणि मृत्यूनंतरही अपमान ?

### स्मशानभूमीवर अतिक्रमण, दादागिरी आणि प्रशासकीय उदासीनतेचा कळस

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात २०२६ सालीही अनुसूचित जातींच्या स्मशानभूमीचा प्रश्न सुटलेला नाही, ही अत्यंत लाजिरवाणी आणि संतापजनक बाब आहे. ज्या देशात संविधानाने समानता दिली, त्या देशात आजही माणसाला मरणानंतरही सन्मानाने जाळता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

गावोगावी अनुसूचित जातींच्या स्मशानभूमींवर प्रस्थापितांकडून अतिक्रमण, तर काही ठिकाणी दादागिरी करून "इथे अंत्यसंस्कार करायचे नाहीत" अशी सरळ धमकी दिली जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष उभा केला, त्याच भूमीत आज अंत्यसंस्कारासाठीही संघर्ष करावा लागतो, यापेक्षा मोठा सामाजिक अपमान कोणता?

ग्रामपंचायतींचा दुजाभाव उघड

अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमी उपलब्ध करून देणे हे ग्रामपंचायतीचे कायदेशीर कर्तव्य आहे.

पण वास्तव काय? उच्चवर्णीयांसाठी स्मशानभूमी गावठाणाजवळ, सोयीच्या जागी अनुसूचित जातींसाठी स्मशानभूमी माळरानावर, गायरानात, रस्त्याविना, पाण्याविना हा केवळ दुर्लक्ष नाही, हा जाणीवपूर्वक केलेला सामाजिक भेदभाव आहे. गावपातळीवर समता प्रस्थापित होऊ नये, यासाठी ठरवून प्रयत्न केले जात आहेत, हे आता लपून राहिलेले नाही.

वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरणार बीड जिल्ह्यात कोणत्याही तालुक्यात ◀◀ पान ३ वर

**मी वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्ष पदावर असो वा नसो, पण जोपर्यंत मी आंबेडकरी चळवळीत सक्रिय आहे, तोपर्यंत स्मशानभूमीचा प्रत्येक प्रश्न प्रशासनाच्या तोंडावर आदळत राहील. हा प्रश्न केवळ जमिनीचा नाही हा प्रश्न मानवतेचा, सन्मानाचा आणि संविधानाने दिलेल्या हक्कांचा आहे.आपण सर्वांनी एकत्र येऊन ही लढाई लढली पाहिजे. कोण आपलं आहे आणि कोण परकं आहे हे ओळखा, ठाम भूमिका घ्या आणि साथ द्या. कारण ही लढाई पुढे मोठ्या प्रमाणात लढावी लागणार आहे. आंबेडकरी चळवळ ग्रामीण भागातील बांधवांनी जिवंत ठेवली आहे ती आणखी बळकट करून पुढे नेण्याची जबाबदारी आपलीच आहे.**

**अजय सरवदे**
**जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी**

## पाटोदा येथील महाशिबिरात वाहतूक शाखेने केली जनजागृती

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथे १८ जानेवारी २०२६ रविवार रोजीआयोजित राष्ट्रीय विधी सेवा महाशिवरात बीड जिल्हा वाहतूक शाखेने स्टॉल लावून स्टॉलला भेट देणाऱ्या नागरिकांना वाहतुकीच्या नियमाबाबत जनजागृती केली तसेच विविध यंत्रे स्टॉलवर ठेवून ते कसे काम करतात याबाबत सविस्तर नागरिकांना माहिती दिली. यामुळे या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत होते.



राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली, महाराष्ट्राचे विधी सेवा प्राधिकरण मुंबई, जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बीड व जिल्हा प्रशासन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने पाटोदा येथील वसंत दादा पाटील महाविद्यालय येथे शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी महा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचीन पाडंकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा वाहतूक शाखेने ही आपला एक स्टॉल ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पवारांनी ते सत्तेत की विरोधात एकदा सांगावं, पुणे पिंपरीच्या निवडणुकीत त्यांना कात्रजचा घाट दाखवला गेला, लक्ष्मण हाकेंची टीका

**बारामती । प्रतिनिधी**

जर पवार फॅमिली महाराष्ट्रात कुठेही जाऊन उभं राहत असेल तर मी कुठेही उभं राहू शकतो. बारामतीच्या जनतेनं आग्रह केल्यास बारामती विधानसभा निवडणूक लढणार असल्याचं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. एकीकडे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढण्याचे संकेत दिले जात असतानाच दुसरीकडे बारामतीत पवारांच्या विरोधात बारामती विकास आघाडी स्थापन करण्याचा निर्णय ओबीसी नेतेलक्ष्मण हाके यांनी जाहीर केला आहे.

गेले कित्येक वर्ष बारामतीतली सत्ता पवारांच्या हातात असताना देखील तालुक्याच्या जिरायती भागात अद्याप देखील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील त्यांना सोडवता आला नाही. पवारांना आता सर्व लोकांनी ओळखलेय त्यामुळे पुणे, पिंपरी चिंचवड सह सर्व



महानगरपालिकातून पवार जवळपास सत्तेबाहेर झालेत. अजित पवार पहाटे उठून पुणे आणि पिंपरी चिंचवड आणि बारामती मध्येच का जातात बाकी कडे का जात नाहीत असा सवाल लक्ष्मण हाके यांनी विचारला. अजित पवार पहाटे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून सांगली महापालिकेत, परभणीच्या महापालिकेत, चंद्रपूरच्या महापालिकेत पहाटे जाऊन विकास बघितलाय का असा सवाल लक्ष्मण हाके यांनी केला. पिंपरी चिंचवड, पुणे महापालिका यांनी जहागीर समजली होती, त्या लोकांनी यांना कात्रजचा घाट दाखवला, असं हाके यांनी म्हटलं आहे.

ठाकरेंनी महाराष्ट्राची अब्रू वाचवली

ठाकरेंनी महाराष्ट्राची अब्रू वाचवली, माझं आणि त्यांचं लई जमतं म्हणून नाही बोलत,ठाकरेंना जनतेनं दाद दिली. संघर्ष करणाऱ्या लढणाऱ्या माणसाच्या पाठीशी सर्वसामान्य माणूस आहे, हे मुंबईच्या जनतेनं दाखवलं. तुम्ही (पवार) एकदा भाजपच्या बाजूला, एकदा याच्या बाजूला, एकदा त्याच्या बाजूला, काय चाललंय नक्की, म्हणून पवार कुटुंबावर बोलतो, असं लक्ष्मण हाके म्हणाले.

भाजपच्या नेत्यांना आता उतरती कळा लागली आहे, मूळचे नेते बाजूला राहिले असल्यास देखील लक्ष्मण हाके यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. तसेच प्रकाश शेंडगे आणि काँग्रेस यांच्या युती बाबत चर्चेवर देखील त्यांनी निशाणा साधला. या निवडणुकीत ओबीसि बांधवांना सोबत घेऊन पूर्ण ताकतीने निवडणूक लढवणार असल्याचं हाके यांनी म्हटलंय. बारामतीच्या दुष्काळी भागात २५ ते ३० गावं आहेत, त्या गावातील जनतेला पिण्याचं पाणी मिळू शकत नाही, हे पाहायला येतोय. बारामतीचा विकास पाहायला बारामतीला येतो, असं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं.

## ससून रुग्णालयात 'पॉक्सो'मधील आरोपी पळाला; बाथरूमची काच तोडून सिनेस्टाईलने पसार

**पुणे । प्रतिनिधी**



पुण्यातील ससून रुग्णालय पुन्हा एकदा कैदी पळून जाण्याच्या घटनेमुळे चर्चेत आले आहे. सोमवारी (दि. १९) दुपारी, अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली अटकेत असलेला सनी गौतम कुचेकर हा आरोपी 'एमआयसीयू' (चखउण) वार्डच्या बाथरूमची काच तोडून पसार झाला. या धक्कादायक घटनेमुळे ससूनच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

आरोपी सनी कुचेकर याच्यावर एका १२ वर्षीय मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. २४ डिसेंबर २०२५ रोजी त्याने लग्नाचे आमिष दाखवून पीडितेला पळवून नेले होते. याप्रकरणी मुलीच्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी त्याच्यावर 'पॉक्सो' (झजउडज) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. २९ डिसेंबर रोजी ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथून त्याला अटक करण्यात आली होती. प्रकृतीच्या कारणास्तव त्याला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथून त्याने पळ काढला.

ससून रुग्णालयातून आरोपी पळण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. गेल्या काही वर्षांतील घटनांवर नजर टाकल्यास प्रशासनाचा ढिसाळपणा स्पष्टपणे दिसून येतो. मार्च २०२५ : विनयभंगाच्या गुन्ह्यातील आरोपी यशवंत साठे पोलिसांना गुंगारा देऊन पसार झाला होता. फेब्रुवारी २०२४ : गुंड शरद मोहोळच्या पत्नीला शिवीगाळ करणारा मार्शल लुईस लीलाकर हा आरोपी पळाला होता (ज्याला नंतर पुन्हा अटक करण्यात आली). ऑक्टोबर २०२३ : संपूर्ण महाराष्ट्र हादरवून सोडणाऱ्या ललित पाटील ड्रग्ज प्रकरणातील मुख्य आरोपी ललित पाटील याच रुग्णालयातून पळाला होता. पॉक्सोसारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी पळाल्यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. एमआयसीयू वार्डसारख्या संवेदनशील ठिकाणी खिडकीची काच तोडली जात असताना सुरक्षा रक्षक आणि पोलीस काय करत होते, असा सवाल उपस्थित केला जात आहे. सध्या पोलिसांनी शहरात नाकाबंदी केली असून सनी कुचेकरच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

# डॉक्टर अपहरण आणि खंडणी प्रकरणातील चार आरोपींना अटक; १५ लाखांचा मुद्देमाल जप्त!

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

डॉक्टरचे अपहरण करून खंडणी वसूल करणाऱ्या टोळीतील चार आरोपींना उरुळी कांचन पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी खंडणीच्या रकम व गुन्ह्यात वापरलेल्या वाहनासह एकूण १५ लाख ८० हजार रुपयांच्या मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.

या गुन्ह्यातील फिर्यादी विठ्ठल किसन चौधरी (वय ५८ रा.कुंजीरवाडी ता.हवेली जि.पुणे) हे १०/०१/२०२६ रोजी रात्री १० च्या सुमारास सोलापूर पुणे रोडने उरुळी कांचन बाजू कडून कुंजीरवाडीकडे कारमधून जात होते.त्यांचे सोबत ड्रायव्हर राजेंद्र छगन राजगुरू हा होता,इनामदार वस्ती येथे डॉक्टरांचे कारला पांढरे रंगाची ईरटीगा कार आडवी मारुन डॉक्टरांची कार थांबवली.ईरटीका कार मधील चार अनोळखी इसम डॉक्टरांच्या कारमध्ये बसले आणि त्यांना चाकूचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली आणि अपहरण करून शिंदवणे रोडला नेत मारहाण करून ४ लाख रुपये खंडणी घेऊन डॉक्टरांना चौफुला येथे



सोडले,आणखी १५ लाख रुपये खंडणी मागितली व नाही दिली तर जीवे ठार मारू अशी धमकी दिल्याने डॉक्टरांनी भीतीपोटी दिनांक १२/०१/२०२६ रोजी १५ लाख रुपये आरोपींना दिले अशी एकूण १९ लाख रुपयांची खंडणी आरोपींनी डॉक्टरकडून उकळली. सदर प्रकाराबाबत पिडित डॉक्टरानी दिलेल्या फिर्यादी नुसार अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला होता,हा गुन्हा गंभीर असल्याने पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी योग्य ते मार्गदर्शन व सूचना देऊन स्थानिक गुन्हे शाखा व उरुळी कांचन पोलीस स्टेशन कडील दोन पथके तयार केली, फिर्यादी व साक्षीदारांकडे तपास करताना डॉक्टरांचे ड्रायव्हर वरील संशय बळावला आणि ड्रायव्हरचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर तपास पथकाने ड्रायव्हर आरोपी राजेंद्र छगन राजगुरू (वय ३२ वर्षे व्यवसाय ड्रायव्हर रा.अनंतपुर पैठण, जि. संभाजीनगर) याला ताब्यात घेऊन चौकशी केली.डॉक्टरांचे अपहरण साथीदारांच्या मदतीने करून खंडणी घेतली असल्याचे सांगितले.त्या माहितीचे आधारे व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी संतोष सोमनाथ बनकर (वय ३६ रा.अनंतपुर पैठण जि.संभाजीनगर),दत्ता उर्फ गोटू बाळू आहेर (वय ३४ वर्ष व्यवसाय शेती,रा.आनंदपुर पैठण,जि.संभाजीनगर), सुनील उर्फ सोनू मुरलीधर मगर (वय ३० वर्षे,व्यवसाय मजुरी,रा.गणेश नगर,गारखेडा परिसर,जि संभाजीनगर)यांना ताब्यात घेतले. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली ईर्टिगा कार किंमत रुपये ८ लाख व खंडणीची रक्कम ७ लाख ८० हजार असा एकूण १५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.आरोपीना न्यायालयात हजर केले असता २४ जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.यातील आरोपी सुनील मगर याच्यावर यापूर्वी मालमत्ता चोरीचे तीन गुन्हे दाखल असून,तो सराईत गुन्हेगार आहे.सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर,पोलीस निरीक्षक सचिन वांगडे व त्यांचे सहकाऱ्यांनी केली.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजीगरे हे करीत आहेत.

# पुणे जिल्हा परिषद अजित पवारांचाच गड; तो त्यांचाच राहील-दत्तात्रय भरणे

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषद हा अजित पवार यांचाच गड आहे आणि तो त्यांचाच राहील, असे स्पष्ट मत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केले. गेल्या ३० वर्षांपासून पुणे जिल्हा परिषद ही अजित पवारांकडे राहिली आहे. या वेळेच्या निवडणुकीत अजित पवार आपली प्रतिष्ठा राखू शकतील का? असा प्रश्न उपस्थित केल्यानंतर ते बोलत होते.

पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत बारामती होस्टेलमध्ये रविवारी बैठक आयोजित केली होती. या बैठकीनंतर दत्तात्रय भरणे माध्यमांशी बोलत होते. भरणे म्हणाले, जिल्हा परिषद निवडणुकीसाठी बैठका सुरू असून, प्रत्येक तालुक्यातील प्रमुख नेत्यांना बोलाविण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे उमेदवार 'घड्याळ' या एकाच चिन्हावर निवडणूक लढविण्याचा निर्णय अजित पवार



घेतील. ग्रामीण भागात दोन चिन्हे असतील, तर मतदारांमध्ये गोंधळ होतो. त्यामुळे कोणतीही आघाडी असली, तरी एकच चिन्ह असणे केव्हाही फायदेशीर ठरते. महापालिका निवडणुकीपूर्वी पक्षातील अनेक जणांनी पक्ष सोडला होता. त्याची पुनरावृत्ती जिल्हा परिषद निवडणुकीत होईल का? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला असता भरणे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसला कोणतीही गळती लागलेली नाही. कोणीही पक्ष सोडणार नसल्याने त्यांना रोखण्याचा प्रश्नच येत नाही. राष्ट्रवादीचे सच्चे कार्यकर्ते आपल्या जागेवर ठामपणे उभे राहणार आहेत. जिल्हा परिषदेचा एकही पदाधिकारी पक्ष सोडून जाणार नाही, याचा मला शंभर टक्के विश्वास आहे. ग्रामीण भागातील जनतेला राष्ट्रवादी काँग्रेसचा विचार मुळापासून माहीत आहे. जालिंदर कामठे पुन्हा पक्षात आले आहेत, तर शरद बुट्टे पाटील हेही राष्ट्रवादीत येत आहेत. उलट राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढत आहे. ग्रामीण जनतेशी राष्ट्रवादीचे घट्ट नाते आहे. प्रदीप गारटकर यांचा जिल्हा परिषदेशी कोणताही संबंध नाही. नगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वीच त्यांनी पक्ष सोडला होता, असेही भरणे यांनी स्पष्ट केले. पुणे उपनगरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काही ताकदीचे कार्यकर्ते गेल्या दोन महिन्यांत पक्ष सोडून गेले. त्याचा फटका महापालिका निवडणुकीत पक्षाला बसला, या प्रश्नावर भरणे म्हणाले की, याबाबत अजित पवार यांनी आधीच खुलासा केला आहे. त्यांनी खुलासा केल्यानंतर मी अधिक बोलणे योग्य नाही. मात्र, शेवटी पराभव हा पराभवच असतो. तो स्वीकारायलाच हवा. पराभवातून काही गोष्टी शिकायच्या असतात आणि आमचे उमेदवार त्यातून नक्कीच शिकतील.

## एम्प्रेस गार्डनमध्ये रंगणार फुलांचा उत्सव; २३ ते २७ जानेवारीदरम्यान भव्य पुष्पप्रदर्शन

**घोरपडी । प्रतिनिधी**

पुण्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या एम्प्रेस गार्डनमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही फुलांचा उत्सव सुरू होणार आहे. हे पुष्पप्रदर्शन दि. २३ ते २७ जानेवारी या कालावधीत भरविण्यात येणार असून निसर्गप्रेमी, पुष्पप्रेमी आणि पर्यावरणाबाबत जागरूक असलेल्या नागरिकांसाठी हे एक महत्त्वाचे आकर्षण ठरणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, २३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते होणार आहे. अशी माहिती ग्री हॉर्टिकल्चर सोसायटी ऑफ वेस्टन इंडिया या संस्थेच्या उपाध्यक्ष सुमन किर्लोस्कर आणि मानद सचिव सुरेश पिंगळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एम्प्रेस गार्डनमधील हिरवाईच्या सान्निध्यात विविध रंगांची, सुगंधांची आणि आकारांची फुलांची मांडणी हे या प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण असणार आहे. देशी-विदेशी पुष्पप्रजाती, सजावटीच्या फुलांची कलात्मक मांडणी, बोन्साय, दुर्मिळ वनस्पती तसेच विविध बागकाम उपक्रमाचे सादरीकरण नागरिकांना पाहता येणार आहे. याशिवाय बागकाम, पर्यावरण संरक्षण आणि निसर्ग



संवर्धनाबाबत मार्गदर्शन करणारे उपक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. या पुष्पप्रदर्शनात पुणे शहरासह राज्यातील विविध भागांमधील नामांकित नर्सरी व्यावसायिक, बागकाम तज्ज्ञ आणि संस्थांचा सहभाग असणार आहे. विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व हस्तकला स्पर्धा, प्रात्यक्षिके आणि माहितीपर उपक्रमांमुळे हे प्रदर्शन केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न राहता ज्ञानवर्धक ठरणार आहे. प्रदर्शनाचा समारोप व विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण २७ जानेवारीला संस्थेचे व सकाळ समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते संध्याकाळी ५ वाजता होणार आहे. यंदाचे पुष्पप्रदर्शन हे ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ आणि पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित डॉ. माधव गाडगीळ यांच्या पवित्र स्मृतीस समर्पित करण्यात आले आहे आले आहे.

## शाळा सोडल्याचा दाखला आणि मार्कशीटसाठी अवैध फी आकारल्यास शाळांवर होणार कारवाई; शिक्षण उपसंचालकांचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

शाळा सोडल्याचा दाखला आणि मार्कशीट देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीरपणे पैशांची मागणी करणाऱ्या शाळा आणि महाविद्यालयांविरुद्ध आता कडक पावले उचलली जाणार आहेत. शाळा सोडल्याचा दाखला आणि गुणपत्रिका देताना कोणतीही अवैध रक्कम आकारली जाऊ नये, असे स्पष्ट आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने दिले आहेत. पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक गणपत शंकरराव मोरे यांनी पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापक व प्राचार्यांना यासंदर्भात लेखी पत्रक पाठवले आहे.

आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी यासंदर्भात तक्रार अर्ज दाखल केला होता. शाळांमध्ये दाखले देताना विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याची तक्रार या अर्जाद्वारे शिक्षण विभागाकडे प्राप्त झाली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत शिक्षण उपसंचालकांनी सर्व शैक्षणिक संस्थांना कडक सूचना दिल्या आहेत. शिक्षण संचालनालयाच्या ५ जून २०२५ च्या संदर्भानुसार, विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्रे देताना कोणत्याही प्रकारची अतिरिक्त फी आकारणे बेकायदेशीर आहे. या आदेशाचे उल्लंघन करून अवैध रक्कम घेतल्याचे निदर्शनास आल्यास किंवा त्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित संस्था आणि जबाबदार व्यक्तींवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशारा या पत्राद्वारे देण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळाला असून शाळांच्या मनमानी कारभाराला चाप बसणार आहे.

## विजयी मिरवणूक काढणे नवनिर्वाचित नगरसेवकाला पडले महागात; सूरज लोखंडे यांच्यावर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर परवानगी न घेता विजयी मिरवणूक काढल्याप्रकरणी जनता वसाहत परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनिर्वाचित नगरसेवक सूरज लोखंडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पर्वती पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई काटकर यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (१७ जानेवारी) महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. जनता वसाहत परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सूरज लोखंडे यांनी अटीतटीच्या लढतीत विजय मिळवला. विजयानंतर सायंकाळी साडेसातच्या सुमारास



त्यांच्या समर्थकांनी जनता वसाहत परिसरातून मिरवणूक काढली.

दरम्यान, निकालानंतर शहरात कोणतीही मिरवणूक काढण्यास स्पष्ट बंदी घालण्यात आली होती. मात्र, पोलिसांची पूर्वपरवानगी न घेता तसेच आदेशांचे उल्लंघन करून मिरवणूक काढल्याचा आरोप लोखंडे यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याप्रकरणी पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस हवालदार आदक पुढील तपास करत आहेत. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी निवडणुकीनंतर कडक निर्बंध लागू करण्यात आले होते. त्याचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांनी दिला होता.

# दौंडमधील गॅस स्फोटप्रकरणी पोलिस तपास संशयाच्या भोवऱ्यात

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड शहरातील हॉटेल जगदंबा येथे झालेल्या भीषण गॅस सिलिंडर स्फोटानंतर संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली. याप्रकरणी होणारा तपास संथ गतीने होत असून पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. दहा कर्मचारी जीवन-मरणाच्या दारात असतानाही हॉटेल मालक, व्यवस्थापक, तसेच गॅस वितरक व पुरवठादार यांच्यावर कारवाई होत नाही. त्यामुळे याप्रकरणी पोलिस नेमके कोणासाठी काम करत आहेत, असा सवाल नागरिक उपस्थित करू लागले आहेत.

या प्रकरणात जबाबदार असलेल्या घटकांवर राजकीय दबावामुळे कारवाई होत नसल्याचा आरोप होत आहे. यबाबत विचारले असता पोलिसांकडून फक्त 'तपास सुरू आहे' असे मोघम उत्तर दिले जाते. दौंड पोलिस निरीक्षक गोपाल पवार यांनी, 'दोघांना नोटीस देऊन चौकशी करण्यात येईल. माहिती घेतल्यानंतर कारवाई होईल,' असे सांगितले आहे. प्रत्यक्षात मात्र सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंद झाल्यानंतरही अटक करण्यास होत असलेली दिरंगाई संशयास्पद मानली जात आहे. त्यामुळे तपासाची ही प्रक्रिया केवळ वेळकाढूपणा आणि कारवाईचा दिखावा तर नाही ना, अशी चर्चा शहरात सुरू आहे. दौंड तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाची भूमिका देखील संशयाच्या भोवऱ्यात आहे. शहरातील अनेक हॉटेल्समध्ये आजही घरगुती गॅस सिलिंडरचा सर्रासपणे वापर सुरू आहे. याबाबत दौंड पुरवठा विभागाकडून कोणतीही ठोस तपासणी केली जात नाही. त्याचप्रमाणे, शहरात काम करणाऱ्या परप्रांतिय अनेक कामगारांच्या नोंदी पोलिस ठाण्यात उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यामुळे शहराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस नेमके करतात तरी काय, असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

# विद्याधाम प्रशाला शिरूर येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर संपन्न

**शिरूर । प्रतिनिधी**

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे तर कायदेविषयक जागरूकताही तितकीच आवश्यक असल्याच्या उद्देशाने विद्याधाम प्रशाला, शिरूर येथे विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. या शिबिराला घोडनदी न्यायालयाचे माननीय न्यायाधीश डी. बी. डोमाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना कायदा, न्यायव्यवस्था व सामाजिक जबाबदाऱ्या यांची ओळख करून देण्यात आली. घोडनदी वकील संघटनेचे अध्यक्ष ड. उदय सरोदे यांनी कायदेविषयक जनजागृतीचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थीदशेतच योग्य-अयोग्याची जाणीव निर्माण झाली तर समाज अधिक सक्षम होतो, असे प्रतिपादन केले. ड. वीरेंद्र सावंत यांनी बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत सविस्तर माहिती देत




बालविवाहाचे सामाजिक, मानसिक व कायदेशीर दुष्परिणाम विद्यार्थ्यांसमोर मांडले.

ड. साहेबराव जाधव यांनी रॅगिंगचे दुष्परिणाम, त्यावरील कायदेशीर तरतुदी व त्यातून होणारे गंभीर परिणाम स्पष्ट केले. रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडते व भवितव्य धोक्यात येते, त्यामुळे अशा प्रवृत्तींपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. ड. सारिका बर्डे यांनी व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याचे महत्त्व अधोरेखित करताना व्यसनांमुळे होणारे आरोग्यविषयक, कौटुंबिक व कायदेशीर नुकसान स्पष्ट केले. ड. वैशाली धोंगडे यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर जबाबदाऱ्या, हक्क व कर्तव्ये यांची माहिती देत सजग नागरिक होण्याचा संदेश दिला.

यावेळी ड. विशाल शेंडगे, ड. विवेक खांडरे, ड. कविता कर्डिले, नीता निंबाळकर, ऋषिकेश बोराडे व लिपिक बोंदर्डे यांनीही विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तज्ज्ञांनी समर्पक उत्तरे देत त्यांना योग्य दिशा दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात न्यायाधीश डी. बी. डोमाळे यांनी कायदा म्हणजे केवळ शिक्षा देणारी यंत्रणा नसून समाजाला योग्य मार्गावर नेणारे साधन आहे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती आत्मसात करून स्वतःसह समाजालाही योग्य दिशा द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक पाचारणे सर व देविकर सर यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती केवळ ऐकून न थांबता ती आचरणात आणावी, तसेच कायद्याचे पालन करून आदर्श नागरिक बनावे, असे सांगितले. या शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व जिज्ञासा दिसून आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता वाढण्यास मोठी मदत झाली असून भविष्यात अशा उपक्रमांचे आयोजन अधिक प्रमाणात व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## बारामतीत अज्ञात महिलेवर अत्याचार करून निर्घृण पद्धतीनं संपवलं; मृतदेह माळरानात सापडल्याने तालुक्यात खळबळ

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील काळखैरेवाडी परिसरात खळबळजनक घटना उघडकीस आली असून, अज्ञात महिलेवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज आहे. काळखैरेवाडी येथील माळरानावर सदर महिलेचा मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. मृत महिलेचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षांच्या दरम्यान असल्याचा अंदाज आहे. तिची ओळख अद्याप पटलेली नसून, आरोपी देखील अज्ञात आहे. घटनास्थळी पोलिसांनी पाहणी केली असता बलात्कारानंतर हत्या करण्यात आल्याचे संकेत मिळाले असून, शवविच्छेदन अहवालानंतरच नेमकी कारणे स्पष्ट होतील, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.



घटनेची माहिती मिळताच सुपे पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला असून पुढील तपासासाठी तो शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे या घटनेमुळे बारामती तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.